म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र १०२९
IRBK-0101029
IRBK-0101029
IRBK-0101029

श्रीकृष्ण प्रसन्न.

# संगीत कंस-कंदन

अर्थात

# कंसवध नाटक.

अंक १ ते ३.

हें पुस्तक

रा. रा. आत्माराम बापूजी करगुटकर,

संगीत संत मिराबाई, सं. संत सखूबाई, सं. मराठा-मंडळ,

इत्यादि नाटकांचे कर्ते यांनीं लिहिलें तें

मुद्रकः-रा. चिंतामण सखाराम देवळे मुंबई वैभव प्रेस

सँढर्स्टरोड गिरगांव, मुंबई यांनीं छापिलें तें

रा. रा. सदाशिव भालचंद्र पाठक यांनीं

धी बॉम्बे कमर्शीअल कंपनी,

बुकसेलर्स आणि पब्लिशर्स् माधवबाग-मुंबई. नं. ४.

येथें प्रसिद्ध केलें.

IRBK-0101029

सर्व हक्क स्वाधीन.

IRBK-0101029

किंमत १२ आणे.

# " कंसकंदन " नाटकाचा " कर्ता " कोण ?

मुंबई हायकोर्ट आ. ओ. सि. ज. सुट नं ३२५/१९१८

वादी.

**आत्माराम बापुजी करगुटकर आणि**

**बाम्बे कमर्शिअल कंपनी बुकसेलर्स्.**

प्रतिवादी.

**पांडुरंग बाळकृष्ण पाठक बुकसेलर्स्.**

आ. बा. करगुटकर हे " कंसकंदन " नाटकाचे कर्ते असून प्रतिवादीनें तें नाटक त्यांचे परवानगीशिवाय छापलें ह्मणून कोर्टात वादीनें प्रतिवादीवर दावा मांडला. दाव्याचा सारांशः—वादीचें ह्मणणें मीं " कंसकंदन " नाटक १९०८ मध्यें लिहिण्यास घेतलें व तें १९११ त पद्यें वगैरे सुद्धां लिहून तयार केलें नंतर मुंबईंत माझे स्वतःचे नाटक कंपनींत प्रयोगरूपानें लोकांपुढें आणलें. नंतर १९१२ त " मुंबई वैभव " प्रेस मध्यें हस्तलिखित प्रत छापण्यास टाकली; परंतु तें काम अर्धें छापून तसेंच पडून राहिलें. नंतर त्याचसालीं " नाट्याभिलाषी नाटक मंडळास " प्रस्तुत नाटकाचे प्रयोग करणेंसंबंधीं परवानगी दिली. तशीच आणखी दोन तीन कंपन्यांसही दिली. पुढें १९१७ चे नवंबर महिन्यांत गजानन चिन्तामण देव यांनीं त्या नाटकाच्या भालचंद्र श्रीपाद काणे प्रकाशक या नांवानें ३००० प्रति छापण्यास सुरवात केली. देव यांना प्रस्तुत नाटकाचे लेखक करगुटकर माहिती असल्यामुळें त्यांनी मुंबईंत त्यांची गांठ घेतली व मी नाटक छापीत आहें असें सांगितलें. त्यावर करगुटकर यांनीं सांगितलें कीं, मी भालचंद्र काणे यास कोणत्याच प्रकारचा हक्क दिला नाहीं, तुह्मी माझे परवानगीशिवाय प्रती छापाल तर त्या रद्द होतील व तुमचेवर कायदेशीर इलाजही केला जाईल. माझे हक्काबद्दल मला रक्कम देऊन वाटल्यास छापणें. देव यांनीं करगुटकरचे विचारें सर्व व्यवहार बाँबे कमर्शीअल कंपनी [illegible] जवळ करून त्यांना करगुटकर यांनीं छापविण्याची परवानगी दिली. पुढें [illegible] कंपनीनें त्या तीन हजार प्रति देवाजवळून घेऊन स्वतःचे नांवानें [illegible] विकण्यास काढल्या. नंतर प्रतिवादीनें कमर्शीअल कंपनीचें नुकसान १९१८ फेब्रुवारींत आपल्या स्वतःच्या प्रेसमध्यें " कंसकंदन " न[illegible]

वादीनें ता.६ मार्च १९१८ रोजीं फिर्याद दाखल करून प्रतिवादीनें अगर इतर कोणीही गोव्याच्या व प्रतिवादीनें छापून प्रसिद्ध केलेल्या प्रती विकूं नये असा कोर्टानें मनाई हुकूम द्यावा म्हणून मागणी केली. व त्याप्रमाणें ता.१८ मार्च १९१८ रोजीं जस्टीस काजीजी यांनीं प्रतिवादीस मनाई हुकूम दिला. झालेल्या हुकुमाची प्रेस नोट इंदुप्रकाश ता. २१।३।१८ चे अंकांत आली आहे. त्यानंतर फिर्यादीचा शेवटचा निकाल दोन्ही बाजूचे साक्षी पुरावे पाहून ता. १५ नवंबर १९१९ रोजीं जस्टीस मार्टीन यांनीं दिला.

**फिर्यादीचें म्हणणें:—**" कंसकंदन " नाटकाचा कर्ता वादी नं १ मी करगुटकर आहे, करितां प्रतिवादीनें छापलेलें १९१७ सालचें नाटक रद्द करून त्यांनीं विकलेल्या प्रतिचें नुकसान मला मिळावें. व सर्व कोर्टाचा खर्च मिळावा.

**प्रतिवादीचें म्हणणें:—**"कंसकंदन " नाटकाचा कर्ता मंगेश मुकुंद देशपांडे रावब्रदर्स प्रेस गोवा हे असून त्यांनीं १९०७ सालीं तें नाटक गोवा येथें छापलें. नंतर १९१६ त देशपांडे स्वतः मुंबईत आले त्यावेळीं त्यांचे जवळून मी त्या नाटकाचा हक्क घेतला. व १९१७ त मी तें नाटक मंगेशरावचे परवानगीनें छापलें, यावरून करगुटकर वादी नं. १ हे या नाटकाचे कर्ते नाहींत. प्रतिवादीचे साक्षीदार परब, पोतदार, गोठस्कर व सीताराम मयेकर यांनीं १९०७ सालच्या प्रति पाहिल्याचें कोर्टांत सांगितलें, व त्याप्रमाणें १९०७ सालच्या तीन प्रति कोर्टांत दाखलही केल्या. त्यापैकीं एका प्रतिवर १९०७ कंसकंदन एवढेंच हिरव्या रंगीत कागदावर छापलेलें आहे, त्यावर प्रेसचें व प्रकाशकाचें नांव नाहीं. दुसरीप्रत गोठस्कर यांनीं आपले जबानींत दाखल केली ती १९०७ सालीं करगुटकर वादी नं. १ यांनीं माझ्या सुवर्णप्रिंटिंग छापखान्यांत छापण्यास आणून दिली त्यावर पुठ्याचें कवर आहे. सन व नांव नाहीं. तिसरी प्रत सिताराम मयेकर यानें हजर केली व ही मी गोवा लायब्रींतून आणली असें जबानींत सांगितलें. त्या प्रतिवरसुद्धां सन नाहीं; मात्र ...वर अर्धं तांवडें फाटलेलें आहे. त्याशिवाय प्रतिवादीनें १९०८ सालची पारोळा सं वि...तःचे प्रेसमध्यें छापलेली त्याच नाटकाची पद्यावली हजर केली. वरील १९०७ सा ? क... पुस्तकें व १९०८ सालची पद्यावली पुराव्याकरितां फिर्याद दाखल झाल्या-...दीनें मागील सन टाकून तयार केल्याचें वादीतर्फे पुरावा पहातां दिसून ...हेत. ...नें आपलें मत दिलें.

**वादी तर्फे पुरावाः**—वादीनें १९०८ सालांत नाटक लिहावयास घेतलें त्यावेळीं कुंजविहारी नाटक वरेरकर यांचें आहे हें त्यांना माहित नव्हतें. १९१० त कुंजविहारी नाटकाचे प्रयोग मुंबईत होऊं लागले त्यावेळीं त्यांतील गोड चाली वादीनें आपल्या नाटकांत घेतल्या, व वरेरकर यांनीही आपल्या जबानींत असें सांगितलें कीं, १९०८ सालीं कुंजविहारी नाटक मी लिहिलें व त्याचा पहिला प्रयोग त्याच सालच्या डिसेंबर महिन्यांत खामगांव येथें करून दाखविला. १९०७ सालांत मी मुळींच नाटक लिहिलें नाहीं. दुसरे ओरिएंटल ट्रान्सलेटरकडे १९१२ त करगुटकरचें नाटक मुंबई वैभव प्रेसमध्यें अर्धें छापून झालेलें रजीस्टर आहे. तसेंच १९११–१२ सालांत मुंबईचे पोलीस परवानें नाटक करण्याबद्दलचे हजर केले. तिसरे नाट्याभिलाषी नाटक मंडळीचे मालक म्हाडिक यांनीं "कंसकंदन" नाटक करगुटकरचेंच आहे. मी १९१३ त गोवा येथें प्रस्तुत नाटकाचे प्रयोग करीत होतों. त्यापूर्वीं या नाटकाचें नांव सुद्धां गोमांतकांत कुणाला ठाऊक नव्हतें. गोव्यांत प्रयोग करीत असतां, नाटकाची हस्तलिखित प्रत चोरीला कशी गेली व मंगेशराव देशपांडे यानें ती कशी छापविली वगैरे सांगून, गोव्याचें करगुटकरच्या नांवचें रजिस्टर हान्डबीलही दाखविलें. गोव्यांत "कापीराईट" चा कायदा नसल्यामुळें १९१३-१४ व १६ त प्रस्तुत नाटकाच्या प्रति देशपांडे यांनीं छापून विकल्या.

हा सर्व पुरावा पाहून जस्टीस मार्टीन यांनीं खटल्याचा निकाल दिला तोः—वादीतर्फे पुरावा पहातां वादी करगुटकर हेच या नाटकाचे कर्ते आहेत. प्रतिवादीनें देशपांडे कर्ता आहे असें सांगितलें! प'तु त्याचे हातचा लेख अगर त्याला स्वतःला हजर केलें नाहीं म्हणून प्रतिवादीनें छापून ज्या प्रति विकल्या असतील त्या प्रत्येक प्रतिमागें किं. ८ आणे प्रमाणें व कोर्टाचा सर्व खर्च वादीस भरून द्यावा. आणि शिल्लक असलेल्या प्रति वादीचे ताब्यांत द्याव्यात. फिर्यादींत झटल्याप्रमाणें प्रतिवादीनें अथवा इतर कोणीही पी. बी. पाठक यांनीं छपून प्रसिद्ध केलेल्या कंसकंदन नाटकाच्या प्रति व गोव्यांत छापून प्रसिद्ध झालेल्या प्रती विकूं नयेत, व कोणी त्या घेऊं नयेत असा कोर्टाचा हुकूम झाला.

**वादीतर्फेः**—मेसर्स जूडा सोलोमन सॉलिसीटर्स व मि. दावर बॅरिस्टर काम चालवीत होते.

**प्रतिवादीतर्फे**—राघवैया नगीनदास सॉलिसीटर्स व मि. गुप्ते काम चालवीत होते.

श्रीशंकर प्रसन्न

# संगीत कंसकंदन नाटक.

नान्दी.

( कांहीं मुलें प्रवेश करून खालील पद म्हणतात. )

पद. ( सकल कुदिन करुनि हरण ) ही चाल.

जोडुनि हे कर । वंदुं श्रीशंकर । श्रीशिव श्रीहर । वंद्य वंद्य ॥ ध्रु० ॥ श्री स्मरारि–शीरिं धरी–सरिता नारि–सुंदरी ॥ अचल विहारि । हर, त्रिपुरारि । स्मरुंच अंतरिं । नीलकंठ ॥ १ ॥ श्री स्मरारि–मारि अरी–विबुधां तारि–संगरीं ॥ रंगणिं रंगत । संकट भंगित । सुचावि संगित । नाट्य छंद ॥ २ ॥

( जातात. नंतर क्षीरसागरांत शेषशाईचा देखावा दिसतो. )

सर्व देव–( पडद्यांत )

ओंवी.

घेईं रे घेईं अवतार घेईं ॥ लक्ष्मिपते तूं लवलाहीं ॥ धरणीवरी कंस मातला भारी ॥ तत्कंदन करी दयाळा ॥ १ ॥

( वरील ओंवी संपल्यावर वैकुंठाचा देखावा दिसतो. )

( विष्णू व लक्ष्मी प्रवेश करितात. )

**विष्णू**—( लक्ष्मीस ) वल्लभे ! माझ्या अनुज्ञेप्रमाणं शेषानें अवतार तर घेतलाच; व आतां मलाही घेणं आहे, यास्तव मृत्युलोकीं वैदर्भ देशाधिप भीमकराजा याची आत्मजा तुला झालं पाहिजे.

**लक्ष्मी**—देवा ! आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे; परंतु मी असं विचारतें–आपल्या ह्मणण्यास भोगिंद्राकडून रुकार तरी मिळाला असा ? कारण, मागच्या अवतारीं त्याला भारीच श्रम भोगावे लागले आहेत.

विष्णू—अग, एक दिवस आह्मीं दोघें क्षीरसागरांत एकत्र असतां मी त्याला ह्मणालों, संत भक्त रक्षून दुष्टांचा निःपात करण्यास्तव आतां आपण अवतार घेऊं. यावर त्याचं उत्तर असं आलं कीं, " सातव्या अवतारीं मी सौमित्र होऊन निराहार घोर अरण्यवास आपल्या बरोबर पतकरून फारच कष्ट सोसले; करितां अवतारनाट्य दाखविण्यासाठीं आपणच अवतार घेऊन, गो ब्राह्मणांचं रक्षण करून दैत्यांचा संहार करावा. "

लक्ष्मी—योग्यच ह्मटलें त्यानं ! लंकेला रणकंदन करून आपली सेवा ही त्यानं बरीच केली आहे प्राणनाथ; आणि सौमित्र होऊन शौर्यहि फारच गाजविलं त्यानं !

विष्णू—ह्मणूनच मी त्याचें मन वळवून त्याला मथुरेस पाठविलें. लक्ष्मी, भोगिंद्राला मी या आठव्या अवतारीं माझा ज्येष्ठ बंधू केला आहे; करितां आह्मां उभयतांनां त्याची आज्ञा पदोपदीं पाळावी लागेल, लक्षांत ठेव.

लक्ष्मी—मी तर मोठ्या आवडीनं त्याची आज्ञा पाळीन; बरं पण प्रभुवरा ! हा देवकीचा सातवा गर्भ, तेव्हां कंसाच्या हातून जिवंत हो कसा राहिला ?

विष्णू—( हंसून ) प्रिये ! तुला सर्व कांहीं कळत असून मुद्दामच जर मला विचारतेस, तर सांगतों ऐक. देवकीस सप्त मास पूर्ण होतांच मी योगमायेला मथुरेस पाठवून दिली, तेव्हां तिनं तो गर्भ देवकीला न कळूं देतां तिच्या गर्भातून काढून गोकुळांत असलेली दुसरी वसुदेवपत्नी जी रोहिणी तिच्या गर्भात नेऊन ठेवला. आतां माया जेव्हां गोकुळांत यशोदेच्या पोटीं जाईल. तेव्हां मी मथुरेंत देवकीच्या गर्भीं राहीन समजलीस ?

लक्ष्मी—( मान हालवून ) अस्सं अस्सं ! आपल्या मनांतून उपजतच गोकुळांत जाऊन भोगिंद्रासह गोरक्षमिषें दैत्य संहारून पृथ्वीचा भार उतरावा असं आहे वाटतं.

( इतक्यांत पडद्यांत सर्व देव ' घेइं रे घेइं ' ही पूर्वोक्त ओंवी म्हणतात )

विष्णू—( ऐकून लक्ष्मीस ) लक्ष्मी ! ब्रह्म, इंद्र, वरुणादि तेहतीस कोटी देव लवकरच अवतार घेण्याकरितां मला सुचवीत आहेत, तर चल तूं ही आपल्या तयारीस लाग.

पद. ( जाउं ध्याउं गाउं स्तवुं० ) ही चाल.

भिमक गेहिं । जनन घेई जा ॥ धृ० ॥ जा जा । उभि नच राहा । वदन न पाहा । वचन मानि । समज ध्यानिं । जनन० ॥ १ ॥
पट्टराणि करिन जाण ॥ तुजासिं, तुझिच वहातों आण ॥ वचन घेई । जलद जाइ । जनन० ॥ २ ॥

( जातात. पडदा पडतो. )

---

# अंक पहिला.

## प्रवेश १ ला.

स्थळ—मथुरा–राजवाड्याबाहेरील जागा. पात्रें–कंस व चौघे रक्षक.

कंस—( चौघां रक्षकांसह प्रवेश करून )—

पद. ( शंभो त्रिशूलधारि० ) ही चाल.

हें काय ये विघ्न ॥ हृदया करी भग्न ॥ चिन्तेमध्यें मग्न ॥ मी फार झालों ॥ धृ० ॥ महिने पुरे सप्त ॥ होतां कसा गुप्त ॥ झाला तरी दुष्ट ॥ मी ठार झालों ॥ १ ॥

( विचार करून ) देवकीचा लग्नसोहळा बंदीखान्यांत अपूर्ण ठेवून वसुदेवाचा देह लोहशृंखलांनीं बद्ध केला, तोच ना मी कंस ? देवकीचे सहा अर्भक शिळेवर आपटून छिन्न भिन्न केले, तोच ना मी कंस ? प्रत्यक्ष देवापेक्षांही पूज्य अशा जन्मदात्या थेरड्या उग्रसेनास बंदींत टाकलं,

तोच ना मी कंस? ज्याच्या प्रचंड विजयगदाप्रहाराचा पृथ्वीकंपित ध्वनी होतांच शत्रुस्त्रियांचे गर्भपात झाले, तोच ना मी कंस? या बलवान् कंसापुढं घडीभर उभं रहाण्याचं सामर्थ्य काळाला नव्हे महा काळालाही नसतां, गर्भांतील गर्भ काढला कुणी—नेला कुणी—छपविला कुणी? काय सांगू! जर कधीं वैरी हस्तगत झाला असता तर त्याला जीवंतच ठेवला नसता. वैऱ्याला देवकीच्या अंकावरून खेंचून त्या भव्य शीळेवर आपटूनच मारला असता. ( वसुदेव देवकीस उद्देशून ) वसुदेवा, हे भगिनी देवकी! तुमच्या आठव्या कार्ट्याच्या हातून माझा अंत होणार, असं ब्रह्म्यानं सांगितल्यावरून मी आठवाच ठार मारणार होतों; परंतु नारदाच्या वचनावर विश्वास ठेवून व त्याच्याच कानमंत्रानं शुद्धीवर येऊन पहिल्यापासून आठव्यापर्यंत ठार मारण्याचा निश्चय केला. आणि म्हणूनच तुमच्या प्रारब्धीं तो बंदिवास; जगांत घडून येणाऱ्या गोष्टींचा अंतर—दुर्दैव तुमचं! नाहीं तर आज तुम्हीं सौख्यसागरांत विहार करून, सर्व बालकांसह आनंदानं आनंदांत नांदलां असतां ( राक्षसांस ) काय रे, त्या गर्भासंबंधानं मुळींच नाहीं का सुगावा लागत?

**रक्षक १ ला**—नाहीं सरकार.

” **२ रा**—सरकार, देवकीच्या तैनातींत असलेल्या दासीही सांगतात कीं, “ गर्भ कांहीं धरणीवर पडला नाहीं. ”

” **३ रा**—सरकार, खरोखर तो पोटांतच गुप्त झाला.

” **४ था**—सरकार, गर्भ गुप्त होण्याचं कारण तुमच्या माराचा धाक.

**कंस**—तुम्हां सर्वांचं ह्मणणं यथार्थ आहे. माझ्या भयानं शेष पृथ्वीला टाकूं पहातो. शचिनाथ स्वर्ग सोडूं बघतो, मग गर्भ गुप्त झाला यांत नवल तें काय? अरे माझ्या धाकानं गंधर्वादि तेहतीस कोटी देव आपलीं दिव्य तोंडं मातींत दडपून छपून बसले. या मृत्युलोकींचे सारे नृपाल माझे मांडलीक झाले; मग गर्भ गर्भांत नष्ट झाला यांत आश्चर्य तें कोणतें?

असो, झाली गोष्ट होऊन गेली; पण आतां याउपर तरी रात्रंदिवस नेत्रांत तेल घालून सावधगिरीनं आठव्याला जपा. आणि जर का कदाचित् सातव्याप्रमाणं आठव्याची स्थिती झाली तर तुम्हां सर्व राक्षसांना देहांत शासन करण्यांत येईल, लक्षांत ठेवा! चला, जा; जा बंदीशाळेकडे ? ( ते गेल्यावर वीरश्रीनें ) सातवा गुप्त झाला तरी हरकत नाहीं; पण—

झंपा.

आठवा वैरि यमलोकिं मी धाडितों ॥ जन्मतां आठवा ठार करितों ॥ धृ०॥ आठवा ठेंचुनी, चेचुनी बोचुनी ॥ भव्य शीळेवरी आपटीतों ॥ १ ॥ आठवा मारुनी भूमि मध्यें गाडुनी ॥ शंभु, विष्णू, विधी जीत धरितों ॥ २ ॥

( त्वेषानें निघून जातो. )

---

## प्रवेश २ रा.

( **स्थल**—बंदीशाळा. **पात्रें**—वसुदेव, देवकी, कंस, चाणूर, मुष्टि, कशल, तोशल व चौघे राक्षस. )

(देवकी निश्चिंत बसली असून वसुदेव सखेद उभा आहे असा पडदा उघडतो.)

**वसुदेव**—( दुःखाचा सुस्कारा टाकून मनांत )—

पद. ( होता प्राक्तनीं हा बंध देवा० ) ही चाल.

वायां वांचलों चांडाळ मी हा हाल भोगाया ॥ धृ० ॥ दुःख सेवाया॥ स्वकांता कारिं गांजाया ॥ देवा जन्मलों वायां ॥ १ ॥ त्रास देती शृंखला । कथूं दुःख कोणाला ॥ बंधमोचन ना दैवीं झालि कृश काया ॥ देवा० ॥ २ ॥

देवा ! मनुष्यजन्मास येऊन हेंच काय मी सृष्टीसौंदर्य पहात आहें ? प्राणीमात्रांना जें सौख्य मिळतं तेंच काय मी सध्यां भोगित आहें ? हाय

हाय! काय ही माझी दशा!! काय हे शृंखलाबंध!!! ऐरावतीसही-जी सहन होत नाहीं ती माझ्या दुर्दैवानें माझ्या पायीं पडावी काय? त्या पापमूर्ती कंसासुरानें आपल्या निर्दय अशा दूतांकडून माझी हवी तशी विटंबना करवावी, व ती मी मुकाट्यानें सहन करून घ्यावी असा प्रसंग माझ्यावर येऊन पडावा काय? मला आजपर्यंत सहा पुत्र झाले; परंतु त्या चांडाळ, कृतघ्न, दुष्ट, दुराचारी, महानीच कंसानें ( शीळेकडे वळून ) या शीळेवर आपटून ठार केले. माझ्या त्या सहाही अर्भकांना मारतेसमयीं, त्या असुराच्या मनास लवभरसुद्धां द्रव आला नाहीं. देवकीनें आकांत केला, त्याच्या पायांवर लोटांगणें घातलीं—मी ही पुष्कळ विनवण्या केल्या; पण त्या खळास आमची कींव मुळींच आली नाहीं. बरोबरच आहे! जे अदय असतात ते दयचा स्वीकार कधींच करीत नसतात. ( देवकीकडे वळून ) आतां ही देवकी आठव्यानें गर्भीणी होऊन उपयोग तो काय? ज्याप्रमाणें सहांची स्थिती झाली त्याप्रमाणें या आठव्याचीही होणार हें उघड दिसतंच आहे? परमेश्वरा, हें पुढं होणारं पहायला मला जिवंत तरी ठेवतोस कशाला? सोडीव एकदां या मायाजालांतून!

**देवकी**—( सहर्ष )—

पद. ( कशि मदनमूर्ति ही० ) ही चाल.

अहा मदिय हृदयीं भय ना मुळीं॥ अति सौख्यचि वाटे या स्थलीं॥ ध्रु०॥ कंसासुर जरि येथ पातला॥ तरि तयाची भीति न मजला॥ दाविन यमपुरि क्षणांत त्याला॥ होइन विजयी भूतलीं॥ १॥

**वसु०**—( घाबरून देवकीस ) देवकी, तूं आतांशी सदासर्वकाळ अशी निर्भयपणानें वागतेस तेव्हां तुला म्हणावं तरी काय? पुढं आठव्याची गती कशी होणार याबद्दल तुला कांहींच का चिन्ता वाटत नाहीं?—

### दिंडी.

कंस जपतो गे आठव्यास पाहीं ॥ कां हंससि आशि, का भीति तुजसि नाहीं ॥ होइ सावध तूं देवकी अतां गे ॥ आठव्यासी तरि ठेव जपुनियां गे ॥ १ ॥

देव०—(भुजा पिटून क्रोधानें) कंस, मुष्टिक, चाणूरादि दैत्यांना जीवें मारून या पृथ्वीचा भार उतरीन व ही बंदिशाळासुद्धां एका क्षणांत फोडीन.—

### पद. ( राम करिं जरि नृप पद० ) ही चाल.

आणा वेगें धनुष्य बाणा ॥ रणांगणीं मी रिपुच्या हनना ॥
जाइन, त्यांना दंडिन जाणा ॥ भय ना मज कसलें ॥धृ०॥
जरासंधनृप आणिन धरुनी ॥ सत्रा वेळां रथिं बांधोनी ॥
काल यवन खल भस्म करोनी ॥ टाकिन क्षणमात्रें ॥ १ ॥
वैकुंठापरि द्वारावति ती ॥ रचीन मी मी समजा चित्तीं ॥
स्वयंवर समयीं जिंकुनि नृपती ॥ आणिन भिमकेला॥२॥

( हांक फोडून ) भौमासुराचं शीरकमल आकाशपंथें उडवून भक्तकैवारें कौरवभार निवटीन व मी धनंजयाचा सारथी होऊन सर्व दुष्टांचा नाश करीन.

वसु०—( मनांत ) ही इतकी मोठ्यानं ओरडत आहे हें जर कंसाला समजलं तर खरोखरच अनर्थ होईल ! तो दुष्ट हिचा व हिच्या बरोबर माझा ही तात्काळ शिरश्छेद करील. आतां कंस करावं ? सातव्याचे वेळीं देखील ही असंच करीत होती. ( प्रकाश ) देवकी, पुरे आतां मौन्य धर.

देव०—कुठची देवकी ? कोण देवकी ? कुठं आहे देवकी ? कुणाला म्हणतां देवकी ? मी पूर्णब्रह्म सनातन आहें. मी सर्व मायाचक्र चालक असून स्त्री, पुरुष, नपुंसकाहून वेगळा आहें; मीच कर्ता, मीच चारी वाचा परता आणि मीच माया निर्मिता. कंस माझ्यापुढं कितीसा टिकाव धरणार ?—

### श्लोक.

नंद, यशोदा अंकिं रांगुनी ॥ वधिन पूतना दुग्ध शोषुनी ॥
गोप, गोपिंशीं खेळ खेळुनी ॥ दैत्य दांडगे वधिन झुंजुनी ॥

मी सगुण आहें, मी निर्गुण आहें, मी थोर आहें, मी लहान आहें, आणखी साऱ्या जगाचं जीवन माझ्याच हातीं आहे.

( पडद्यांत देव गर्भाचें स्तवन करितात. )

गद्य.

जय जय देवकी जठर गर्भा । पायेब्धिवासा परेशा पंकज धारेका ॥ पशुपते जिवना लक्ष्मिरमणा । कैवल्यनिधी कमनियरुपा निष्कलंका ॥ अनंत–पाणी अनंत–चरणा । अनाम असंग अक्षरा परज्ञा अव्यक्ता ॥ कंस मदोन्मत्त खलासि कंदुनि । मुक्त करी झणिं वसुदेव देवकि अनंता ॥ १ ॥

( इतक्यांत मल्ल व राक्षस यांसह कंस येतो. )

**कंस**—( गर्वानें देवकीस ) देवकी, बोल सत्वर तुझ्या गर्भास किती मास झाले ? ( ती बोलत नाहींसें पाहून ) काय, तूं माझ्या प्रश्नाचं उत्तर देत नाहींस ? ( ती हंसते हें पाहून मनांत ) अरे ? पूर्वीप्रमाणं ही भयभीत नसून जद्वत्, मृगेंद्रा पुढं निर्भय अजा तद्वत् आज माझ्यासमोर बसली हें काय ? ( डोळे फिरवून प्रकाश ) अग ए गर्विष्ठे देवकी,—

**पद.** ( क्षात्रधर्मिं रमताती ते वीर ) ही चाल.

बंदीशाळा योग्य हि तुजला ॥ वास्तव ये स्थलिं पतिसह नांद ॥ धृ० ॥ आजवरी तव सहा अर्भकें ॥ ठार मारि हा कंस कौतुकें ॥ असुनी याचें धैर्य ग इतकें ॥ गर्व करिसि कां फार ॥ १ ॥

**देव०**—दुष्टा कंसा ! अरे रावापुढं रंक, सुज्ञापुढं मूर्ख, मृगेंद्रापुढं जंबुक, चंडांशापुढं खद्योत व विप्रापुढं मातंग तसा तूं मजपुढं येऊन उभा राहिला आहेस. मी कोण–माझं नांव काय हें तुला कळलं ? या पंडितावरोबर तूं अजापालक टिकणार तो किती वार ? तुझी आयुष्यमर्यादा आतां किंचित् उरली आहे तोंवर तूं आपल्या वैभवसुखाचा वाटेल तसा उपभोग घे जा; जा–जा–जा.

**कंस**—( देवकीस न्याहाळून पहातो व हाक फोडून राक्षसांस ) पळा, काळाच्या हातांत सांपडूं नका. मला काळाच्या तोंडांत देऊं नका. मला काळाच्या घरांत ओढूं नका. तो मला खाईल, तुह्मांला खाईल—गिळील-क्षणांत चावून देखील टाकील. तो पहा—अक्राळ विक्राळ तोंड पसरून माझ्याकडे पहात आहे ! हा-हा-हा-आ-ला !

( बोबडी वळून वेडा होतो )

**चाणूर**—महाराज, अक्राळ विक्राळ तोंड पसरणारा काळ कुठं आहे दाखवा ?

**मुष्टिक**—महाराज, तुह्मां आह्मांला खाणारा चांडाळ कुठं बसला दाखवा ?

**शल**—महाराज, आह्मां असुरांना गिळणारा महाकाळ कुठं छपला दाखवा ?

**तोशल**—महाराज, तुमच्या निर्भय चित्ताला धक्का देणारा वैरी कुठं गेला दाखवा ?

**देव०**—( दांत ओठ चावून मल्लांस ) अरे नीच राक्षस मल्लांनो, या वेळीं जरी मी लहान आहें तरी तुमच्याशीं भयंकर युद्ध करण्यास तयार आहें. माझ्यापुढं जितके दैत्य येतील तितक्यांचे तिळा तिळा एव्हढे तुकडे करून टाकीन. अवघं मथुरापट्टण रक्तमय करून सोडीन. माझ्या माता पित्याचा जो तुम्हीं छल मांडला आहे त्याचा पुरा सूड घेईन. माझ्या आंगांत युद्ध करण्याची ताकद आहे. माझ्या आंगांत दैत्यांचीं शतशः प्रेतं पाडण्याचं बल आहे. या कंसाचा मुगुट लाथेनं तुडवून याची शिखा हातांत धरीन व याचा कंठ चराचर चिरीन. तुम्हां असुरांचा वंश जगाला त्रास द्यायला ठेवणार नाहीं, समजलांत?

**कंस**—( शुद्धीवर येऊन रागानें ) काय ? आम्हां असुरांचा वंश ठेवणार नाहींस ? तुझं हें वाक्य ऐकतांच माझ्या वज्रमय देहांतील सारं रक्त खवळून गेलं आहे; शरीरांतील सर्व शीरा तटातट तुटत आहेत. माझे

पूर्वज स्वर्गांत माझ्या बलाची तारीफ करीत आहेत. देवकी सांभाळ ! माझ्या अपमानाचा मोबदला म्हणून ही कट्यार तुझ्या पोटांत खुपसून तुझा प्राण घेतों. ( वसुदेवास ) अरे वसुदेवा, तूं ही सांभाळ ! हा कंस खवळून गेला आहे. हा आतां अकाश पाताळ एक करील. तुझी आहुती या कट्यारीला देईल. करा मरण्याची तयारी; पण हो ! तो समोर कोण आहे ? ( कट्यारीकडे पाहून ) माझ्या हातांत तूं कोण आहेस ? कट्यार–कट्यार–कट्यार–पाड यांचे खून !

( मारण्यास धांवतो तोंच खालीं पडतो )

**सर्व राक्षस**—( त्याला उठवून ) सरकार, असं काय करतां ? मनाचा धीर कां सोडतां ? आठव्याचें भय मनांत जागृत कां ठेवतां ?

पद ( वृक्षस्कंधीं नीच नरा ) ही चाल.

आठव्यासि ठार ठार ॥ करूं जगांतुनि पार ॥ अम्हि जिवित उदार ॥ बलवंत ॥ धृ० ॥ कोण त्यासि तारणार ॥ दैत्य क्रोध अनिवार ॥ अम्हि खचित करणार ॥ अरि अंत ॥ शूर शूर वीर फार ॥ करिं घेउनि तलवार ॥ कीं असति तयार ॥ जयवंत ॥ १॥

**कंस**—राक्षस हो ! ही समोर देवकी नसून, शंख चक्र युत साक्षात् श्रीविष्णूची मूर्ति हातांत सुदर्शन घेऊन माझ्याकडे टक लावून पहात आहे. ( घाबरून ) अरे पहातां काय ? मला सांभाळा ! मला धरा ! ! मला पळवा ! ! ! घात घात–घात झाला ! माझा अंतकाल समीप आला ! माझ्या बळकट शक्तीचा भार कमी झाला ! माझा विजयमुगुट डळमळूं लागला ! माझा हा सव्य बाहू एकाएकीं लटका पडला ! माझ्या सवागांत थर थर कंप सुटला ! माझा पराक्रम आज इथें खास खुंटला ! फसलों– इथें व्यर्थ आलों ! सांपडलों–वैऱ्याच्या हातीं खचीत सांपडलों ! ! अरे धांवा रे धांवा–मला भव्य अशा पेटाऱ्यांत कोंडून ठेवा अथवा पाताळांत लपवून ठेवा ! ! !

पद. ( जाऽऽऽराधे ) ही चाल.

हाऽऽऽला । धांवला । घात जाहला । पाप्ली..पडला । वधण्या सजला । वैरी हाऽकाळा ॥ धृ० ॥

( मल्ल धरतात त्यांना आवेशानें )

सोडा जातों अरि वधण्यातें ॥ देतों त्याला बळि शक्तितें ॥ अप्र-टीतों या ममहातें ॥

( पुन्हां घाबरून )

अंतर जळलें । आयु संपलें । काळाऽऽआला ॥ १ ॥

( राक्षस पुढें येतात त्यास रागानें ) खबरदार पुढं याल तर. तुम्हीं सर्वजण राक्षस नसूनं चतुर्भूज श्रीविष्णू आहांत; (देवकीकडे पाहून) अरे आठवा–खरोखरच आठवा ! धरा, धरा या आठव्याला ! बांधा बांधा, बांधा या आठव्याला ! अगदीं जखडून बांधा–घट्ट बांधा ! मारा–झोडा–तोडा फोडा–अरे, तो वसुदेव कुठं आहे ? ( त्याला पहातो व घाबरून ) नको–नको, त्याला या वेळीं पहाणंसुद्धां नको. हा आठवा ‘ आ ’ करून माझे पाठीस लागला याला आधीं आकळा; काय करूं ! यारे या माझे नेत्र बांधा या ! ! ( राक्षस येतात त्यांस ) नका येऊं–नका बांधूं–मीच झांकतों ! ! ! ( झांकतो व रडत ) हाय हाय ! अंतर्यामींदेखील तीं कृष्ण मूर्ती मला दिसते अँ ! ( डोळे उघडून ) आतां मात्र माझी धडगत मला ठीक भासत नाहीं ?—

( कांपत कांपत )

पद. ( अनंग रिपु ग छळित० ) ही चाल.

मदंग कांपत भितिनें खास ॥ धृ० ॥ मि शूर भूप असुनि, आज ॥
हें सोडि मदिय मन धिरास ॥ नाहिं खचित जिवित आस ॥
कोणी–यारे–न्या या नृपास ॥ १ ॥ मज वैरि धरित हाय हाय ॥
मज रडावि रडावि धाय धाय ॥ धैर्य गळत करुं मि काय ॥ धांवा
–मारा–या आठव्यास ॥ २ ॥

( सर्वांसह पळून जातो )

**वसु०**—( कंस गेल्यावर मनांत ) देवकीच्यां या आठव्या गर्भाचा प्रतापच कांहीं निराळा दिसतो; कारण, देवादिकांना ज्यानं पादाक्रांत करून पृथ्वींतील नृपाल अंकित केले, त्या पंचानन कंसानं आज या बंदीशाळेंत येऊन भयानं पलायन केलं, ही फार आश्चर्याची गोष्ट आहे! ( विचार करून ) अयोध्येंत दशरथांगने कौसल्येचे पोटीं श्रीरामचंद्र जन्मून दशाननाचा संहार केला, तसा प्रकार तर या मथुरेंत होत नसेल ना ? काय असेल तें असो ! देवकीचं मुखावलोकन केलं ह्मणजे साक्षात् श्रीशेषनारायणच मी पहात आहें कीं काय असा भास होतो. ( मथुरेस उद्देशून ) हे मथुरे, किती तूं मंदभागिनी ! अयोध्या जशी श्रीरामचरणानं पावन झाली तशी तूं होत नाहींस ना ? हर हर ! तें तुझ्या दैवीं नाहींच ग नाहीं; आणि कदाचित् असलं तरी—

साकी.

तो खल कंस न सौख्य सेवण्या देइल बाई तुजला ॥ तदिय पृष्ठिवरि पाप वाढलें साहसि किति भाराला ॥ ' हतभागी मथुरा' ॥
वदत मि, नाहिं तुला थारा ॥ १ ॥

( पडदा पडतो )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**–रस्ता. **पात्र**–चाणूर, मुष्टिक, शल व तोशल.

( चौघे एकदम प्रवेश करितात )

**चाणू०**—धिःकार असो देवकीच्या त्या धीटपणाला ! तिच्या सारखं कठोर अंतःकरण आह्मां असुरांचंही असेल ! गर्भाचे चौकशीस आलेल्या बलवंत प्रत्यक्ष काळापेक्षांही काळ अशा बंधला अपमान असिलतेनं मारावं काय ?

**मुष्टि०**—मी तर त्या वेळीं क्रोधानं खवळून गेलों होतों; पण उपयोग काय ? महाराजांचा हुकूम असता तर त्या देवकीचा गर्भ तिचं पोट फाडून बाहेर काढला असता, व ज्या शीळेवर सहा गर्भ मारले गेले त्या शीळेवर मीच स्वतः आपटून मारला असता.

**शल**—महाराजांचा ह्मणजे केव्हढा दरारा ! केव्हढं विलक्षण शौर्य ! अशा वीराची त्या चांडाळदेवकीनं बंदीशाळेंत अपमानकारक जी स्थिति केली, तीचं स्मरण झालं कीं माझ्या आंगाचा सारखा भडकाच होतो.

**तोशल**—माझं तर मस्तक भणाणून डोळ्यापुढं क्रोधाग्नीच्या प्रचंड ज्वाळा दिसतात.

**चाणू०**—त्या वेळचे ते देवकीचे उद्गार ह्मणजे माझ्या मस्तकावर शंभर कुऱ्हाडीचे घायच मारल्याप्रमाणं झालं. काय तिचे ते कठोर शब्द !

**मुष्टि०**—विषयच सोडा तो आतां. चला राजवाड्यांत आणि महाराजांची स्थिती पूर्ववत् असल्यास त्यांना शुद्धीवर आणण्याच्या युक्त्यालढवूं

**शल**—चला, शुद्धीवर न आले तर लंबकर्ण वैद्याचं औषध देऊं.

**तोशल**—नाहीं तर वृषभ वदन मांत्रिक बोलावून तंत्र मंत्र करण्याचे विचार चालवूं चला—वेळ होत चालला.

( जातात )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—बंदीशाळा. **पात्रें**—देवकी, विष्णू व वसुदेव.

( आठ वर्षांची विष्णूची मूर्ती देवकीपुढें उभी असून वसुदेव निजला आहे असा पडदा उघडतो. )

**देव०**—( विष्णूस ) हे भक्तवत्सला श्रीधरा “ साक्षात वैकुंठवासीं विश्वंभर देवकीचे पोटीं आला ” असे उद्गार लोकांच्या मुखांतून आले

पाहिजेत, ह्मणून ह्मणतें माझ्या पोटीं तुझा जन्म झाला पाहिजे; यास्तव नऊ महिन्याचं बालक होऊन माझं स्तन पान कर.

विष्णू—मी लहान बालक आतां होईन; पण कंस मला मारील त्याचं मोठं भय वाटतं.

देव॰—तूं जगकर्ता जगहर्ता असं असतां तुला कंसाचं भय? खचीत सांगतें तुझं दर्शन कंसाला झालं किं, त्यानं तुला साष्टांग नमस्कार घातलाच समज.

विष्णू—तो कसचा नमस्कार घालतो. आधींच त्यानं गाईब्राह्मणांचा छल मांडला आहे; आणि तशांत त्याला वेडही चमत्कारीक लागलं आहे. तो मला आपटून मारल्याविना राहणार नाहीं. मी मेलों किं तूं धाय धाय रडत बसशील.

देव॰—सगळ्या जगाचं जीवन तुझ्या हातीं असून, तूं सगळ्या नाटकाचा सूत्रधार; आणि कंसाचं भय मनांत धरतोस हें पाहून मला मोठं आश्चर्य वाटतं!

विष्णू—बरं तर मी तुझ्या ह्मणण्याप्रमाणं लहान होतों; पण मला त्वरीत उचलून गोकुळांत नेऊन ठेवा. आतां नुकतीच यशोदेला कन्या झाली आहे. तिला इकडे आणा व मला तिकडे ठेवा. असं कराल तर मी कंसाच्या हातून जिवंत राहीन. आणि वडील बंधू बलरामासह गोकुळांत मौजेचे खेळ खेळून दोघेही अल्पदिवसांत इकडे येऊं व कंस-कंदन करून तुमचं बंधविमोचन करूं.

देव॰—मग वेळ नको; देवा! लवकरच बालक हो व माझ्या अंकावर घडीभर रांग.

विष्णू—( स्वगत ) आतां हिच्यावर योग माया घालून आपण बालरूप धरावं.

( बालक होऊन देवकीपुढें लोळतो. )

देव०—( मायावश होऊन बालकास अंकावर घेते व वसुदेवास )—

पद. ( प्रिया उठो जागोरे० ) ही चाल.

प्रिया उठा जागृत व्हा । अंकिं घ्या सु-रम्य बाळ ॥ धृ० ॥
गोंडस किति हें । बालक माझें । लपवुं कुठें यास ॥
शब्द मुलाचा कळल्या वरती । येइल येथ कंस काळ ॥ १ ॥

वसु०—( जागृत होतो व सहर्ष देवकीस ) कुठं आहे ग माझा आठवा बाळ ?

देव०—प्राणनाथ ! हें पहा हो माझं सुंदर अर्भक. घ्या आधी याला नि कुठं तरी लपवा !

वसु०—( घेऊन )—

पद. ( बहिरे खुदा प्यारे० ) ही चाल.

लपवुं या मुला ॥ कोठें ॥ हा बाळ धाकुला ॥ हा न लपे जरी झांकिला ॥ धृ० ॥ श्रीसूर्य धाकला ॥ मुष्टीं न झांकला ॥ तैसा बाळ हा सांवळा ॥ झांके केविं वद मला ॥ कोठें० ॥ १ ॥ नच चंद्र झांकला ॥ जरि कांखे घातला ॥ तैसा बाळ० ॥ २ ॥

देव०—नाथा ! नका हो उघडा ठेवूं माझ्या लाडक्याला ! झांका आधीं वस्त्राखालीं ?

वसु०—( हंसून ) अग वेडे ! भूतांत शंकर, रंकांत राव, मूर्खांत पंडित आणि अभाग्यांत श्रीमंत कधीं झांकेल काय ? जरी रावणा सारखा दहा शिरांचा व वीस हातांचा बलवान् असला, तरी त्याच्यानं मेरू पर्वत काखेला घालून नेववेल काय ?. त्याप्रमाणं ज्याचा प्रकाश अवघ्या बंदीशाळेंत पडला तो हा माझा छावडा या वस्त्राखालीं झांकेल काय ? ( मुलाचें तोंड कुरवाळून )—

पद. ( मन हें गण गुण० ) ही चाल.

किति ही मूर्ती सुंदर सावलि । लालि किती गालीं ॥धृ०॥
हृदय विसावी । ही ग आठवी ॥ तदिय जठरीं आली॥१॥
मदिय वदन बघ निरखुनि पाही ॥ हर्ष भरित हें मन्मन
होई ॥ ठेवुं काय खालीं ॥ २ ॥

देव०—नका ठेवूं खालीं—रडेल कदाचित्; द्या पाहूं मजकडे! ( घेते. )

वसु०( कांहींवेळ विचार करून ) सखे! आतां पुढं कंस करावं? हा शुभवृत्तांत बाहेर प्रगटतांच अनर्थ होणार ना आज? दयिते! पुत्राचं रक्षण होईल अशी उत्तम युक्ति तरी शोधून काढ.

देव०—( आठवल्या सारखें करून ) प्रिया, आज श्रावण मास. बुधाष्टमी असून कृष्णपक्ष आहे, तेव्हां हें नक्षत्र कोणतं असावं बरं?

वसु०—नक्षत्र-रोहिणी.

देव०—होय ना! मग उत्तम झालं. उठा, आतां क्षणाचाही अवधि न करतां माझ्या तान्हुल्याला गोकुळांत नेऊन ठेवा. प्रस्तुत यशोदा प्रसुत झाली असून तिला कन्या झाली आहे. बाळाला तिकडे ठेवून कन्येला इकडे आणा म्हणजे आठ पोरं व्याल्याचं सार्थक झालं! घ्या ती टोपली नि घाला याला त्यांत. ( बाळास ) बाळा, जातोस का तूं गोकुळांत?

वसु०—वल्लभे! बाळाला ‘गोकुळांत न्या’ म्हणतेस; पण द्वारांचीं कुलपं कपाटं कशीं उघडणार? पायांतलि शृंखळांच्या खळखळ नादानं रक्षक नाहींत का जागे होणार? तशांत पर्जन्य काळ असल्यानं यमुनेला पूर तर तुडुंबच आला असेल, कसं करूं? या माझ्या सांवळ्याला कसा घेऊन जाऊं? ( असें म्हणून मुलाच्या मुखाकडे पहातो तोंच हातापायांतील शृंखला तुटून पडतात ) देवकी, आतां आमचा कारागृहवास लवकरच संपणार यांत शंका नाहीं; याचं कारण—हें पहा.

शृंखला दाखवितो ) बाळाचा मुखचंद्र प्रेमदृष्टीनें न्याहाळीत असतां आपो-आप शृंखला तुटून पडल्या परमेश्वराची करणीच कांहीं विचित्र ! ( टोपली आणून ) ठेव पाहूं मुलाला या टोपलींत.

देव०—( ठेवते व त्याचें मुख चुंबून )—

पद. ( यवन बहू मातले ) ही चाल.

ही मथुरा सोडुनी ॥ मदिय तनया प्रेमानंदें ॥ जाइं झणीं गोकुळीं ॥ धृ० ॥ खेळ सुखानें बाळा तेथें ॥ प्रियकर होशिल तूं नंदातें ॥ बाल लिला तव दावीं त्यातें ॥ होशिल रे बहु गुणी॥१॥

वसु०—( टोपलीस हात घालून ) उचल पाहूं. ( ती उचलते, वसुदेव डोईवर घेऊन जाऊं लागतो. )

देव०—( गहींवरून ) थांबा हो प्रियकरा ! माझ्या बाळाचं मला आणखी एकवार मुखावलोकन करूं द्या.

वसु०—( टोपली हातावर घेऊन )—

पद. ( मति जरी पदीं दृढ झाली ) ही चाल.

त्यजिं झणीं दया प्रिय कांते ॥ गोकुळीं सोडितों यातें ॥
देव०—कशि त्यजूं तरी बाळातें ॥
वसु०— त्यजि० ॥ धृ० ॥ सु-वच मानी । समज स्व-मनीं ।
आणि ध्यानीं । माझि वाणी ॥ लोभ नच वरि मुळिं ।
पड न तूं भवजाळिं । जाऊं देइं मातें ॥ १ ॥
देव०—( मुलास ) कमलवदना । कमलनयना । नंदसदना । जासि तूं ना ॥
वसु०— सुंदरि मंजरि । सभय तुं अंतरिं । राही—
देव०— मी हि येतें ॥
वसु०— त्यजि० ॥ २ ॥

( वसुदेव जातो पडदा पडतो. )

---

## प्रवेश ५ वा.

स्थळ—बंदीशाळेचा मोठा दरवाजा.

वसु०—(आपोआप दरवाजा उघडतो त्यांतून प्रवेश करून आनंदानें)

पद. ( कां नयनीं जल ये सहजें विकलित० ) ही चाल.

भय सरलें सारें तुरलें लवभर, मन हें रंगलें ॥ धृ० ॥
लोह सु-द्वारें बंध तिं असतां ॥ धड धड उघडलिं स्पर्शीचि करतां ॥
रक्षक निजले सन्निध येतां ॥ कार्य मि माझें साधिलें ॥ १ ॥

( रस्त्यावर येऊन ) बंदीशाळेपासून जसजसा दूर जात आहें, तसतशी भीतिही कमी होत आहे. ( आकाशांतून पुष्पवृष्टि होते. ) अरे ! इथं आसपास वृक्ष, वेली कांहींएक नसतां हे पुष्परेणु कुठून पडतात ? ( टोपली हातावर घेऊन ) समजलों. ( बाळास ) बाळा, तूं किती भाग्याचा बरं ? माझ्या सोमवंशीं बुधवारीं जन्मून बुधाचा जनिता जो चंद्र, त्याला पवित्र केलेंस यास्तव—

पद. ( तारिल गे भव वारिल गे० ) ही चाल.

तुज वरती । सुर, सुर युवती । हे गाळिति कुसुम सु-रेणू रे ॥ धृ० ॥
यादव वंशीं जन्मुनि बाळा ॥ पार फसाविलें खल कंसाला ॥
उपजत जासी नंदघरा । तूं गोकुळवासी गवळी रे ॥ १ ॥

( पुन: मस्तकावर घेऊन ) आतां होईल तितक्या त्वरेनं एकदां गोकुल गांठलं पाहिजे; ( अरण्यांत येतो तोंच पाऊस पडतो. ) पण या मेघाला काय करावं ? हा तर एक सारखा वर्षतच राहिला ? ( मेघास रागानें )—

पद. ( काळास विक्राळ० ) ही चाल.

मेघा तुं चांडाळ ॥ काळा महा काळ ॥ दावीसिं विक्राळ ॥
रूप कां मला ॥ धृ० ॥ माथीं पहा बाळ ॥ माझा सुकुमार ॥
कांता जिवाधार ॥ हारे खला ॥ १ ॥

१०२९
नाटक.



**वसुदेव**—या बाळासह या यमुनेंतून पार पडून जाऊं कसा ?

[ पृष्ठ १९.

Joshi Art, Bombay 1.

( यमुनेसन्निध येऊन ) मेघाला न जुमानतां कसा ना कसा तरी इथ-पर्यंत तर आलोंच; परंतु या बाळासह या यमुनेंतून पार पडून जाऊं कसा ! अबब ! किती तुडुंब भरली आहे ही ? ( देवास उद्देशून ) देवा ! तार अथवा मार, पैलतीरीं गेल्याविना गत्यंतरच नाहीं. [ यमुनेस ]—

पद. ( येई अभिनव मज हि दशा. ) ही चाल.

यमुने तन्मन सदय करी ॥ निज हृदिं प्रेमा अमित धरी ॥ ध्रु० ॥
हा सुत मम नच, असे तुझा गे ॥ समजुनि ऐसें, सदये या गे ॥
पैलतिराला पोंहचिव ह्मणें गे ॥ जाइल मग हा नंदघरीं ॥ १ ॥

( असें ह्मणून यमुनेंत उतरतो. मध्यंतरीं गेल्यावर आकंठ पाणी होतें. पाण्यास कृष्णाच्या दक्षिण पायाचा अंगुठा लागतांच तें डुभंग होतें; तोंच पडदा पडतो. )

---

## प्रवेश ६ वा.

स्थळ—गोकुळ—नंदाचा वाडा. पात्रें-वसुदेव, यशोदा, कृष्ण व माया.

वसु०—( वाड्याच्या दरवाजावर येऊन ) एवढ्या तुडुंब यमुना पूरांतून निभावून या नंदाच्या वाड्यापर्यंत मजल मारली. आतां आंत प्रवेश करून, देवकीनं सांगितल्याप्रमाणं बाळाला ठेवून लवकरच परत मथुरेस जावं. ( दरवाजास हात लावतांच तो आपोआप उघडतो. वसुदेव आंत जातो. आंत गेल्यावर यशोदा निजली असून जवळ कन्या आहे असा देखावा दिसतो. वसुदेव कृष्णास तिच्या शेजारीं ठेवून दुःखानें ) अर्भका ! आजपासून ही यशोदाच तुझी आई; हीच तुला प्रेमानं स्तनपान करून तुझं संगोपन करील ! ( मायेला टोपलींत घालून डोईवर घेतो व गहींवरून कृष्णास ) आपल्या आईबापांच्या सौख्यापासून जन्मतांच दूर राहिलास ना लाडक्या ? काय हें माझं फुटकं प्राक्तन ! ( देवास उद्देशून )—

पद. [ हे बाप माई दैवत होई ] ही चाल.

रे लोकपाळा । धांव कृपाळा ॥ प्रभो तारि या बाळा ।
सबळ दयाळा ॥ धृ० ॥ प्रभो येथ याची । नसे बाप आई ॥
सांवळा निळा काळा ! मदयि जिव्हाळा ॥ १ ॥
सुदैवी यशोदा । खरी भाग्यशाली ॥
गोवळा दहींवाला । हा बाळ जहाला ॥ २ ॥

( जातो तोंच पडदा पडतो. )

---

## प्रवेश ७ वा.

**स्थळ**—मथुरा—रस्ता. **पात्रें**—कंस, चाणूर, मुष्टिक, शल, तोशल, लंबकर्ण, वैद्य, वृषभवदन मांत्रिक व रक्षक.

**कंस०**—[ प्रवेश करून ] जन्मल्यापासून हा कालपर्यंत मी हजारों लढाया मारल्या. पण माझी अशी स्थिती कधींही झाली नव्हती ? काय हा सध्यांचा प्रसंग ! असा हा भित्रेपणा माझ्या अंगांत घोर संग्रामांतही आला नव्हता. छेः मला तो माझा अपमान सहन होत नाहीं; मी आज देवकीला ठारच मारणार ! [ लंबकर्ण, वृषभवदन यांसह मल्ल येतात त्यांस ] अरे बलाढ्य मल्ल, या रे माझ्या उरांत भरलेली भयाची धडकी पार नाहींशी करा ! नाहीं तर माझें हें कठीण हृदय फाडून माझा शेवट तरी करा ! द्या-द्या माझ्या हातांत माझं विजयी खड्ग द्या ! मी देवकी-समोर जाऊन उभा रहातों ! तिनें मला मान दिला तर हंसत परत येतों आणि अपमान केला तर तिच्या प्राणाची आहुती बंदीशाळेतील शिळा-देवीसमोर देऊन, शेवटीं अपमान—अपमान—अपमान ह्मणून मी-सुद्धां मरतों !

( असें ह्मणून भूमीवर पडतो. )

**चाणूर**—( वैद्यास व मांत्रिकास ) लंबकर्णवैद्य, वृषभवदन मांत्रिक ! पहा—पहा महाराजांची दशा ! त्या जबरदस्त पिशाच्चानं, बलवंताचं प्रखर बल कसं नष्ट केलं तें ? त्वरा करा आणि त्या दुष्ट पिशाच्चाची त्रेधा नि

त्रधा उडवून महाराजांस शुद्धीवर आणा. आमच्या राज्यांत असा प्रकार सुरू झाला. ही पेटती आग विझविण्याचा उपाय खुंटला. आह्मां मल्लांचा नाइलाज झाला. आमच्यानं ही सरकारस्थिती आतां मुळींच पहावत नाहीं, त्यापेक्षां आत्महत्त्या करावी हेंच उत्तम !

( कट्यार उरांत मारण्याकरितां हात वर करतो )

**मुष्टि०**–( त्याचा हात धरून ) काय हा तुझा दुष्ट विचार ! चाणूरा, आत्महत्त्या कुणी करावी ? मुष्टीघातानं पृथ्वीचं पिष्ठ करणारे आह्मी मल्ल असतां, पिशाच्चप्रयोगानं महाराज वेडे झाले ह्मणून आत्महत्त्या करून घेऊं या काय ? ठेव ती कट्यार ! मांत्रिकाच्या तंत्राच्या पाहिल्याच प्रयोगानं सरकार शुद्धीवर येतील, धैर्य धरा !

**शल**—चाणूरा, आम्हां मल्लांपेक्षां तूं मोठा बलवान् मल्ल आहेस, असुरज्ञातीचा अभिमानी आणि स्वामीकार्यी इमानी असून हा अज्ञानपणा काय तुझा ? अरे महाराजांच्या वेडानं तूंचसा काय; पण आम्हीदेखील विचारतरंगांत तरंगत आहों.

**तोशल**—शलाचं ह्मणणें अगदीं खरं आहे. स्वामीहितेच्छु वीरांनीं धैर्य धरून जसं रणांगणांत झुंजावं, तसं मंत्रतंत्रांनीं व औषधोपचारांनीं स्वामीचं वेड पार उतरून टाकावं. आज नगरांत अशी खबर पसरली आहे कीं, ‘ देवकीस नऊ महिने पूर्ण झाले ’ यावरून आज रात्रौ वा उद्यां दिवसा ती प्रसूत होणार खास; करितां महाराजांच्या वेडाबरोबर आपण वेडे न होतां आठव्यास टपत असलं पाहिजे. आठवा ठार झाला कीं सरकारांचं भय सरलं.

( हे वरील शब्द ऐकतांच कंस सावध होऊन उठून बसतो. )

**कंस**—[ चोहोंकडे पाहून ] आठवा आठवा, कुठं आहे आठवा ? छाटून टाकतों, दाखवा दाखवा ! चोर दरोडेखोर ! चोर दरोडेखोर ! तो का मी–कीं माझी मनोदेवता ? छे छेः आठवा चोर–दरोडेखोर ! आठवा

मेला कीं हा कंस निर्भय झाला ! घाबरून कोण ! कोण तूं ग्रहण ? यह कंसचंडांशास ग्रासणारं आठवं ग्रहण ?

[ तोंड झाकतो. चाणूर वैद्यकास व मांत्रिकास खूण करितो. ते आपापले प्रयोग सुरू कारितात. ]

चाणू०---( वैद्यास ) वैद्य, अगदीं जलाल औषध द्याल तरच हें पिशाच्च महाराजांस सोडून दूर होईल. तसं घडत नसल्यास तुम्हींच तें सेवन करा.

मुष्टि०---( मांत्रिकास ) मांत्रिक, पाहूं तुमच्या मंत्रांचा प्रताप ! घाणेरड्या पिशाच्चास कुपींत बंद करून घोर अरण्यांत न्या व तिथें प्रचंड शिळेखालीं पुरून ठेवा.

शल---नीट मेहनत घ्या; नाहीं तर कराल भोंदूपणाचा कावा.

तोशल---महाराज आहेत कोपिष्ठ, म्हणून म्हणतों आपआपल्या विद्येचे खरे प्रयोग आतांच करून दाखवा.

( ते तसें करितात. )

कंस---( तोंड उघडतो व त्यांचे ते प्रयोग पाहून रागानें ) अरे, मद्वैऱ्या आठव्या ! तूं माझ्यासमोर निर्भय बसून माझी वज्रमय काया दग्ध करणार काय ? ( वर उठून )---

श्लोक.

भूलोक हलवीन मुष्टीप्रहारें ॥ भूगोल उलथून पाडीन सारें ॥
पाताळ चुरडीन लत्ताप्रहारें ॥ हरि, हरा पळवीन तलवारधारें ॥१॥

( तलवार घेण्यास जातो तोंच खालीं पडून कांपत कांपत ) मी तुला नाहीं मारीत ! तूं कोण हें मी जाणलं ! श्रीधरा, हे विरिंचिजनिता---हे क्षीराब्धिजामाता---मी तुझा दास आहें ! मी तुझा अंकित आहें ! मी तुझा आश्रित आहें ! ( थांबून रागानें ) काय, मी तुझा आश्रित ? तुझा अंकित ? तुझा दास ? छद्, असं कालत्रयीं घडणार नाहीं; अरे अधमा ! ( घाबरून )

नाहीं नाहीं—अरे प्रभो ! ( संतापून ) दुष्टा, नव्हे नव्हे तूं प्रभू नव्हे, तूं माझा शत्रू ? ( भिऊन ) हं हं हं अरेरेरे ! ( किंकाळी फोडून पडतो ).

**रक्षक**—( धांवत येऊन कंसास ) सरकार, चला चला बंदीशाळेंत देवकी प्रसुत झाली.

( सर्व चकित होतात )

**कंस**—( सावध होतो व वर उठून ) काय, देवकी प्रसुत झाली ? चाणूरा ! हा रात्रीचा समय म्हणजे पिशाच्चकाल, यास्तव तूं धांव आणि बंदीशाळेच्या मोठ्या दरवाजावर उभा रहा जा. मुष्टिका, तूं बंदीशाळे-पासून थोड्या अंतरावर उभा राहून मार्ग पहात रहा. शला ! तूं बंदी-शाळेच्या पिछाडीस छपून बसून कुणी आठव्याच्या सहाय्यास आल्यास त्याला तिथेंच गिळून खा. तोशल व मी बंदीशाळेंत जाऊन देवकी-भोंवतीं गराडा घालतों. आठवा माझ्या हातीं येतांच शीळेवर आपटून त्याचा चेंदामेंदा करतों; आणि वसुदेव देवकीस त्या दुःखांतून मुक्त करून वाड्यांत आणून ठेवतों. चला, काळाचा जन्म झाला. करा आठ-व्याला ठार–ठार–ठार !

( सर्वांसह त्वेषानें निघून जातो. )

---

## प्रवेश ८ वा.

**स्थळ**—बंदीशाळा. पात्रें–वसुदेव, देवकी, माया, कंस, व तोशल.

( देवकी मायेला घेऊन बसली आहे व वसुदेव तिच्याशीं बोलत आहे असा पडदा पडतो. )

**वसु०**—लाडके ! या मुलीला घेऊन आंत आलों नाहीं तोंच सारीं दारं आपोआप बंद होऊन, ह्या शृंखला माझ्या हातापायांत पूर्ववत् लट-कल्या हा हिच्या येण्याचा प्रताप कमी का समजतेस ?

**देव०**—पण हें काय! ही मोठ्यानेंच रडूं लागली ?

**वसु०**—ती जर न रडेल तर 'देवकी प्रसूत झाली' ही वार्ता बाहेर कशी पडेल? 'हिरा गेला आणि गार आली' तशांतली ही गोष्ट झाली! हीचं रडणं आणि द्वाराबाहेर रक्षकांची धांदल उडणं हें भविष्य सध्यांचं. पहा आतां इतक्यांत येईल कंस!

( कंस तोशलासह धांवत येतो )

**कंस**—( देवकीस ) देवकी, दे-दे-दे-तुझा आठवा कार्टा माझ्या हातीं आधीं दे ?

( घेण्यास सरसावतो )

**देव०**—( मायेस पदराखालीं झांकून कंसास) बंधो! नको रे या माझ्या आठव्या अर्भकाला ठार मारूं? याला मारशील तर तुझ्यावर खास आकाश कोसळून पडेल! दाहि दिशा आपलं अक्राळविक्राळ तोंड पसरून तुला गिळतील! या बाळाचा मृत्यु ह्मणजे तुझ्या तोंडास काळं लागणं! तुझ्या वज्रमय कायेची माती होणं! कंसा, किती रे तूं निर्दय! किती रे तूं पाषाणहृदय! विचार कर, अझून तरी शुद्धीवर येऊन मनांत दया धर! हें बघ, मी तुझ्या पायांवर मस्तक ठेवतें; तुला हात जोडतें, या माझ्या एवढ्या अर्भकाला तरी जीवदान दे?

**वसु०**—(देवकीस)त्याची पायधरणी करून तो तुझं कुठं ऐकतो आहे?

पद ( न संशय हा पिशाच्चीकाय ) ही चाल.

जगांतिल पूर्ण पापांचा प्रिये गोळा असे हा गे ।। मुलींना
कींव असुरा या खरा वैरी असे हा गे ॥ धृ० ।। जनक,
जननी । युवति, भगिनी । आप्त कोणी । हा न मानी ॥
अ-संतोषी सदा त्वेषी वधी बाळ सहा हा गे ॥ १ ॥

**कंस**—( वसुदेवास ) वसुदेवा, थांब—धीर धर. या कार्ट्याचा आधीं प्राण घेतों; मग तुझ्या त्या स्वामिनिंदक जिव्हेचे शतशः तुकडे करून,

तुझं शरीर गिधाडांपुढं फेंकतों. ( देवकीस ) देवकी, कर पुढं कार्टी ! ( मायेचे पाय धरून ) सोड, देवकी सोड—

पद. ( थांब जलद जलद, ) ही चाल.

सोड, तदिय तनय मदिय अरि ग ठार मारितों ॥ धृ० ॥
देव०— तदिय हृदय अदय करि न—
कंस— विनवि मज न; शिळेसिं अर्पितों ॥ ( ओढतो )
देव०— ( रडत ) हाय ! ओढि न मदिय बाला ॥
कंस— वधिन खचित याला ॥
देव०— ऐक भूमिपाला ॥
कंस— वैरि मारितों ॥ १ ॥

( असें म्हणून मायेला हिस्कावून घेतो व गरगर भवंडून शीळेवर आपटणार तोंच ती हातांतून निसटून कडकडत आकाशांत जाते. )

कंस—( भयभीत होऊन मनांत )—

पद. ( करुनि धड धड नाद० ) ही चाल.

घात झाला खास कारीं ॥ कडड सुटला भारि अंबरीं ॥
सुटुनि करिंचा जात वैरी ॥ करुनि तांतडी ॥ धृ० ॥

माया—( विशाळ रूप धरून आकाशांतून मध्यभागीं येते व क्रोधानें कंसास)
नीचा मूढा मलिन कंसा ॥ पापपंकीं पड न ऐसा ॥ तदिय शत्रू कृष्ण खासा ॥ वसत गोकुळिं ॥ १ ॥

( परत जाते. सर्व तिचा प्रकाश पहात रहातात, तोंच पडदा पडतो ).

## प्रथमांक समाप्त.

# अंक दुसरा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**—गोकुळ–कुंज. **पात्रें**–राधा व कृष्ण.

( राधा एका शीळेवर वर तोंड करून बसली असतां मागून कृष्ण तिचें चुंबन घेत आहे असा पडदा उघडतो. )

**राधा**—( वर उठून कृष्णास ) नंदात्मजा! अंतर्यामीं तुझं सांवळं रूप आठवून तुझे संगतीचं स्मरण करीत असतां, तूं इथं अकस्मात् प्रगट रे कसा झालास?

**कृष्ण**—[ पुढें येऊन ] राधे! हंसतां खेळतां, उठतां बसतां, चालतां बोलतां, खातां, पीतां व नवनीत चोरतां 'राधाविलास' मूर्तिमंत माझ्या समोर असतां मी नको का येऊं तुझ्या अधीर मनाला शांतता द्यायला?

**राधा**—[ वसंतास उद्देशून मनांत ]

**पद.** ( घेई घेई बघुनि मी सदा० ) ही चाल

देई देई मना शांतता । वसंता—आनंदा ॥ गिरिधारी<br>
लावी रे । झणीं माझिया छंदा ॥ धृ० ॥ अनंता मनीं ।<br>
काम तूं अणी ॥ गंध दे पसंतसा सुरेख एकदा ॥ १ ॥

**कृष्ण**—( राधेस ) प्रत्यक्ष मी कृष्ण सन्निध असतां कोणत्या विचार-तरंगांत गुंतलीस राधे?

**राधा**—( प्रकाश ) भर यौवनानं मस्त झालेल्या या राधेवर, त्या अनंग दांडग्यानं स्वशक्तीचा प्रचंड भार टाकला. हा आतां कसा नष्ट होणार हे विचार मनांत तरंगत आहेत झालं!



कृष्ण—राधे रोज रोज तुझ्या कामेच्छेला रुकार द्यायला मला लाज वाटते गडे [पृ. २७

Joshi Art, Bombay. 1

कृष्ण०—( अनंगास उद्देशून )—

श्लोक.

गोपसुंदरे राधिके वरी ॥ जोरि करिसि तूं अनंगा जरी ॥
तरी शासना करिल सत्वरी ॥ कुंजविहारी, जाण अंतरीं ॥ १ ॥

राधा—काळा मुरारि कुंजविहारी ॥ होता तो झाला राधाविहारी ॥
अनंता अतां न अंत बघतां ॥ 'राधाविलासा' हो नीत भोक्ता ॥२॥

कृष्ण—राधे! रोज रोज तुझ्या कामेच्छेला रुकार द्यायला मला लाज वाटते गडे!

राधा—वेड तर नाहीं लागलं! कंकणं भरलीं आहेस का हातांत?

कृष्ण—तुझा समज वेडा; अग तूं गोरी व मी काळा म्हणून लाजतों. माझ्यासारख्या काळ्याला काळीभोळी मिळेल तर अगदीं प्रेमांत प्रेम मिसळून गोरीची संगत क्षणांत सुटेल!

राधा—

पद. [ मान गोरी न मोरी ] हां चाल.

नार गोरी वा काळी वा भोळी। किं बरी घरीं संसारीं ॥ धृ० ॥

कृष्ण—गोरी नारी चंचल भारी ॥ काळी बाळी पतिश्रम वारी ॥
भोळी खुळी जन कैवारी ॥

राधा—वाहवाहवा ॥ १ ॥

कृष्ण—चंचल राधा। मी हरि साधा। प्रेमास आणील बाधा ॥

राधा—वाह! वाहरे मुरारी। कुंजविहारी। रे पुतनारी। रे
गिरिधारी। संगित भारी। तव कृति सारी।

कृष्ण—वाहवाहवा ॥

राधा—नार गोरी० ॥ २ ॥

( एकमेकांस आलिंगन देतात तोंच पडदा पडतो. ]

## प्रवेश ३ रा.

स्थळ—कुंजवनाचा रस्ता. **पात्रें**—कृष्ण, वाकड्या, लंगड्या, नकट्या, पेंद्या, वडज्या, तोतऱ्या व बोबड्या.

**कृष्ण**—( प्रवेश करून )—

**पद.** [ मूर्ख दामाजी ] ही चाल.

प्रियकर मत्जननी। निजली असें बघुनी ॥ गोपीमनेच्छा।
पूर्ण करण्या। आलों मी उठुनी ॥ ध्रु० ॥ गोपीच्या सदनीं।
मोदें अजी शिरुनी ॥ नवनीत सारें। खास सेउनि।
जाइन मग पळुनी। परि न येति अझुनी। मम सौंगडे कोणी ॥
माध्यान झाली। रात्र, मग कधिं जावें वृंदवनीं ॥ १ ॥

( पडद्यांकडे पाहून ) सौंगडी हो, माझ्या यशोदा आईला मी जसा फसवून या ठिकाणीं आलों, तसे तुम्हीं आपापल्या आईला फसवून याल तर आज फारच मौज करूं !

**पद.** [ मेराजोबन का रस० ] ही चाल.

मम सौंगडि बा रे। विलंब कां रे। या रे झणीं येथ सारे ॥ ध्रु० ॥
माझी मुरली। मंजु वाजली ॥ नसे ह्मणुनि कां रुसलां रे।
बा रे या रे ॥ १ ॥ गोप सु-युवती। निद्रित असती ॥
असा समय ना दवडा रे ॥ बा रे या रे ॥ २ ॥

( वाकड्या व लंगड्या धांवत येतात. )

**वाकड्या व लंगड्या**—[ कृष्णास ] कृष्णा नमस्कार [ तसें करितात ]

**कृष्ण**—वाकड्या लंगड्या, तुम्हीं दोघे आलांत; पण बाकीचे आपले सौंगडी कुठें राहिले ?

**वाक०**—( चाहूल ऐकल्यासारखें करून ) हां ! हे इकडून कुणी येत आहेत वाटतं.

[ नकट्या, पेंद्या, वडज्या, तोतऱ्या व बोबड्या हे आपापल्याशीं बोलत येतात ]

**नकट्या**—हीं रांत्रं आपल्या संमदं रूपांनं मलां तंरं भेंडसवूं लागली!

**पेंद्या**—अरे अगदींच काळोखी रात्र, रस्तादेखील दिसत नाहीं.

**वडज्या**—किती तरी आंधार हा!

**तोतऱ्या**—म–म–मला ठें–ठेंच ला–ला–लागली!

**बोबड्या**—[ कृष्णास ] कीत्ना नमथ्काद.

[ सर्व नमस्कार करितात. ]

**कृष्ण**—[ हंसून ] गड्यांनो, आज ही नमस्काराची रीत नवीनच कुठची काढलीत?

**वड०**—तुझे गडीच जर झालों तर मग तुला नको का नमस्कार कलाराय?

**बोब०**—अदे कीत्ना! या कादोख्या दात्दींतून आम्हीं निभावून येथवर आदों, तेव्हां तुदा नमथ्काद केदात् पायदे! तूंत पहा बदं! या कादोखांतून थदगत्या थदग दान तुदवीत येनं ह्मनदे केवधं धोक्यातं काम?

**तोत०**—की–की–किती का–काळोख हा–हा बरं?

**नक०**—आंकांशांनं जणूं कांळीं कांबंळींच पांघरलीं!

**कृष्ण०**—गड्यांनो! तुम्ही सगळे सुरक्षीत आलांत ना पण!

**पेंद्या०**—यांत काय संशय; तुझी आमच्यावर कृपा असल्यावर आम्हीं काळालाही कापून टाकूं.

**बोब०**—अदे हदी! त्या उदवदीत्या पिंपदावद एक मोथ्या दुथ्थ मुंदा आहे, त्यादा दिखीत मी भ्यादों नाहीं.

**कृष्ण०**—तूं आहेसच तसा धीट गडी; बरं आज तुम्हांला काय पाहिजे?

**वाक०**—मला दही पाहिजे.

**लंग०**—मला ताक पाहिजे.

**नक०**—मंलां दुंधांवरंची सांई पाहिजे.

पेंद्या०--मला पोटभर दूध पाहिंजे.

तोत०—म-म-मला द-दह्यांचं म-म मडकंच पा-पाहिजे.

बोब०—मदा बाबा एक थुंदद गवदन पायदे.

[ सर्व हंसतात ]

कृष्ण०—सर्वांच्या इच्छा आज पुरवितों—

पद. [ शंभो शिवहर करुणाकर० ] ही चाल.

जाऊं। वज्र वधुं। सदनीं सारे। चोरुनिया। दहिंदुध खाऊं ॥ धृ० ॥ नव यौवनभरें गोपि रुपी ॥ हुडकुनि काढूं। तद छल मांडूं। निज कृति दाऊं ॥ १ ॥ गोदी चिमणी नव यमनी ॥ करिती नखरे। दाविति तोरं ॥ त्यांना फसवूं ॥ २ ॥

बोब०—हदी, तूं थांगतोथ खदं; पण—

पद. [ गुन्हेगारी धन्याची० ] ही चाल.

घद धदे पहा हा ऊद मादा ॥ धृ० ॥ तौय कद्म हे युक्ति वांतुनि पतेद कधिं नत कोना ॥ युक्ति हिन नदथदनीं थिदतां सुकतो अपुद्या प्दाना ॥ १ ॥ पदवा पददों थपदा वद्रुनी हातत दुददा मादा ॥ तोदी कदतां दहिं दुध खातां माद हि भादी खादा ॥ २ ॥

नक०—खंरंचं बोबंड्यां ? चोरींच्यां कामीं म्हंणजें बरींचं युक्तीं लंढंवांवीं लांगतें.

लंग०—आणि माझ्यासारखा लंगडा तर असल्या कामीं मुळींच उपयोगी नाहीं !

कृष्ण०—गोपसखे, तुम्हीं रोजच्या प्रमाणं निर्धास्त मजबरोबर या.

पेंद्या०—आज आरंभीं कुणाच्या घरांत शिरायचं कृष्णा ?

कृष्ण०—यमनीच्या.

बोब०—कीत्ना, यमनीत्या दे कथ्या कदतां? तिमनीत्यात घदांत थिदूंयां!

कृष्ण—नको नको. यमनीच्याच घरांत शिरूं यां; कारण तिच्या घरीं दूध पुष्कळ असतं.

वाक०—होय, तिच्याच घरीं दहीं चापून खायला मिळेल.

नक०—तीं मोठीं धींट बांयंकों आंहें. सांभांळां एंखांद्यांलां धंरींलं बिंरींलं.

कृष्ण०—अं! ती काय धरते. आणि कुणाला धरलंच तर जोरानं तिच्या हाताला चावा घ्या म्हणजे ती सोडून देईल.

बोब०—हा दंगदा तित्या हातीं मिदेद.

लंग०—छट्! मी कसचा तिच्या हातीं मिळतो. झट्दिशीं असा पळून जाईन.

( पळून दाखवितो सर्व हसतात. )

कृष्ण०—( गावांतील रस्त्यावर येऊन ) बरं चला तर. तें पहा समोरचं यमनीचं घर.

पेंद्या०—कृष्णा, त्या छपरावरून हलकेंच आंत उतरलं पाहिजे.

कृष्ण०—होय गड्या! तूं ह्या सर्वांना घेऊन पुढं हो, मी मागाहून येतों.

बोब०—गदबदा कदाद तद खबदाद.

तोत०—तं–तूं–तूंच सां–सांभाळ!

बोब०—अदे दा;

कृष्ण—अगदीं गप्प उतरा हं!

( सारे गडी जातात. मागाहून कृष्ण जातो. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**—यमनीचें घर. **पात्रें**— सौंगड्यासह कृष्ण, यमनी व चिमणी.
( यमनी शिंक्याखालीं अंथरुणावर झोंपली आहे असा पडदा उघडतो. )

**कृष्ण**—( गड्यांसह प्रवेश करून हलक्या स्वरानें त्यांना ) गड्यानों! आज यमनीच्या घरांत शिल्लक म्हणून दहीं ठेवूं नका. ती पहा शिक्याखालीं विवशी निजली आहे? ( सर्वजण शिंकीं तोडून व मडकीं फोडून दहीं, दूध, ताक पितात. कृष्ण यमनीच्या उशावरचें शिकें तोडून दहीं, तिच्या आंगावर सांडतो.

**यमनी**—( जागी होते व वर ऊठून )—

**पद**. ( राग कसा येई न मातें ) ही चाल.

दहिं कसें हें खालिं पडलें ॥ कोण मेले हे घरांत शिरले ॥ धृ० ॥
दुध दहि खाऊन गेले ॥ धांवा ग मारा ग सारे पळाले ॥ १ ॥

( असे म्हणून त्यांच्या पाठीं लागते व लंगड्याच्या तोंडांत दोन चपराका मारून वडज्याचे पाठीवर एक थप्पड देते. इतक्यांत बोबड्या डोईतील मडक्यासह अडवा येतो, त्याचें मडकें लाटण्यानें यमनी फोडते. बोबड्या तिच्या तोंडांत थप्पड देऊन मडक्याचा कांठ गळ्यांतच घेऊन पळतो. )

**कृष्ण**—( मनांत ) शाबास गड्यांनो, खाजच जिरली टवळीची आज!

**यम०**—( सर्व गडी पळाल्यावर डोळे चोळीत चोळीत ) थांबा मेल्यांनो, आतां कुठून पळून जाता तें बघतें. ( धांवत जाते तों समोर कृष्णास पाहून त्याला धरते व हंसत हंसत ) कृष्णा! सांपडलास. हें कृत्य सारं तुझंच रे तुझं!

**कृष्ण०**—मला ग कां? ज्यांनीं तुझं दहींदूध चोरलं त्यांना धर जा!

**यम०**—तूं त्यांचा नायक. तेव्हां तुलाच हा अस्सा बांधला पाहिजे ( भिंठी मारते. )

**कृष्ण०**—अग सोड मला ! ( हिस्का देऊन सुटतो. )

**यम०**—हरी ! तुला नाहीं का समजत माझ्या मनाची स्थिति ?

पद ( चल चल जाऊं ) ही चाल.

हरि मज काम गांजि भारी ॥ करिं शांत काम वैरि ॥ धृ० ॥

( जवळ जाते )

**कृष्ण०**—( दूर सरून ) न वच रुचत । न मन नटत । न मन झटत ॥

**यम०**—समज अंतरीं ॥ ( हात धरते )

**कृष्ण०**—कर मम सोडी जाग दूरिं ( हात हिसकाऊन घेतो )

**यम०**—मम वच मोडिं ना मुरारी ॥ ( अगदीं जवळ जाते. )

**कृष्ण०**—त्यजिं काम ।

**यम०**—काम वैरी ! ॥ १ ॥

**कृष्ण०**—तूं थोर, मी लहान तेव्हां मी तुझ्या कामाची शांतता कशी बरं करूं ?

**यम०**—कृष्णा ! आतां कितीरे अंत पहाशील ? ज्याप्रमाणें त्या राधेची इच्छा पुरवितोस तशी माझीहि पुरीव ह्मणजे झालं !

**कृष्ण०**—( मनांत ) या यमनीनं माझी मूर्ति आपल्या निर्मल हृदय स्थळीं सांठविली आहे, करितां हिची इच्छा मला पूर्ण केलीच पाहिजे. ( तिला आलिंगन देतो. )

**यम०**—( आस पास पाहून हळूच ) कृष्णा, त्या चिमणीनं आपलं कृत्य पाहिलं वाटतं ? अगबाई ! आतां कस करावं ? हें पहा कृष्णा, हें मी सारं तुझ्यावरच लोटतं.

**कृष्ण०**—माझ्यावर ग कां ?

**यम०**—तूं लहान आहेस, तेव्हां तुला हें शोभण्यासारखें आहे. ( चिमणी येते. )

**चिमणी**—( प्रवेश करून ) कायग यमने; मघां तूं मोठ्यानें ओरडत होतीस ती कां ?

**यम०**—पहाग, चोरटा दह्यादुधाचा नास करून आणखी माझी मस्करी करतो आहे ती ?

**चिम०**—( कृष्णास ओळखून ) अग, हा तर नंदाचा कृष्ण [ कृष्णाचे हात धरून ] अरे हरी, हे तुझे चाळे बरे नाहींत हो !

पद ( बारे जाऊंरे सांवरीया ) ही चाल.

कान्हा येसी तूं अमुच्या सदनीं कां अशा रजनीं ॥ वदरे कां ॥
प्रतिनिशिं येसी ॥ दूध दधी खाशी ॥ दंगा करिसी ॥ पळुनी
जाशी ॥ ठेवूंबांधुन-खांबा । करिसी निंद्य ती करणी ॥ १ ॥

( कृष्णास खांबास बांधतात तोंच पडदा पडतो. )

## प्रवेश ५ वा.

स्थळः—रस्ता. पात्रें—सौंगड्यासह कृष्ण.

( सर्व सौंगडी येतात )

**बोब०**—थदी दे दद्यांनों थदी, तीं यमनी दबाद थदी; पण मी दों थुप पदादों तों पाद दांब देदों. कायदे, तिनं कुनाथ दंदू बिंदू तद नाहीं ना ?

**वांक०**—मला धरायला ती सटवी येत होती, तेवढ्यांत मी कीं नाहीं जो पळालों तो शेजारच्या गोठ्यांत दडून राहिलों.

**लंग०**—खऱ्या शहाण्यानें ह्मणून आजपासून त्या कृष्णाच्या नादीं लागून त्याच्या मसलतींत राहूं नये. तुम्ही सर्वजण पळालां हें पाहून मी तुमच्या मागून धांवत होतों, इतक्यांत त्या यमनीनं मला धरिलं आणि दोन चार चपराका तोंडांत दिल्या.

**वड०**—तुम्ही सगळे जण धुम झालां आणि त्या सटवीनं पळता पळतां माझ्या पाठीवर एक थप्पड दिली.

नक०—मी पळतां पळतां धाडदिशीं पडलों.

तोत०—ब-ब-बरं ग-गड्यानों क-क-कृष्ण कुठं आहे ?

पेंद्या—थांबा, मी त्याला हांक मारितों. ( हांक मारितो ) छे ! त्याला संगीत हांक मारिल्याविना तो लवकर येणार नाहीं ( हांक मारितो ) अरे कृष्णाऽऽ

पद ( तुझी रानांत गाय ) ही चाल.

अरे कृष्णा तुं धांव । येरे कुंजांत जाव । तुला हांसेल गांव तु झणि येई ॥ धृ० ॥

छे नाहीं येत.

हरि आलि तुझि आई । लय कर तु रे घाई । तुज भिति कशि नाहीं । तुज ह्मणुं काई । झणिं येई ॥ १ ॥

किती बुवा घट्ट मनाचा हा ?

घरि सोडि ये गाई । त्यांना चाराया जाई । तुज मारील तुझी माई । तुं दहीं खाई णिं येई ॥ २ ॥

मला वाटतं त्या यमनीनं त्याला धरून ठेवलं असावं.

बोब०—होय, त्या द्वाद यमनीनंच त्याला धदून थेवदय.

नक०—बरं ठेवूं दे. आपण उजाडेपर्यंत त्याची वाट बघत बसूं. ( सर्व बसतात. )

बोब०—( हंसून ) मदा बाबा दयदय हांथूं बेतंय याला मी काय कदूं ( पोट धरून हंसतो. )

पेंद्या०—तुला लय लय हांसूं येतें तें रे कां ?

बोब०—अदे, काय थांदूं ?

पद ( बारा वाजुनी तारी ) ही चाल.

केंदी दंमत तिती केदी दंमत दे तोदांत थप्पद दिदि आथि ( तोतऱ्याच्या तोंडांत मारतो. )

सर्व—वाहवारे ॥

बोब०—केदी० ॥ धृ० ॥ हदू हदू पद धपायदा ॥ येत होता पन कथें तिदा ॥ पादूं मी दागदि धदायादा ॥ दुथ्ता मीदा मद पदायदा ॥

सर्व—किती धीट तरी हा भ्याला न तिजला ॥

पेंद्या—तोदांत थप्पड० ॥ १ ॥

( कृष्ण येतो त्याला सर्व भेटतात. )

कृष्ण—गडयानों थांबा तरी ! तुझांपैकी कुणाला तिनं मारलें कायरे ?

पेंद्या—पण तुला मारलं कीं काय आधीं सांग.

कृष्ण—तुम्ही सारेजण पळून आल्यावर त्या यमनीनें माझे हात मागच्या मागं घट्ट बांधून मला धरलं, सुटण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केला; परंतु त्या दांडगेपुढें माझं कांहींच चाललं नाहीं.

वांक०—तुला तिनं आज बांधिलें, आणि काल त्या गोदीनें मला बांधलें.

वड०—मला मारलं.

तोत०—मा-मा-झा का-कान ची-ची-चीलटला.

लंग०—माझ्या कंबरेंत लाथ मारली.

नक०—माझी शेंडी उपटली.

पेंद्या—मला अकस्मात् धरून व कुठलीशी कुरापत काढून, हा डावा हात पिळला.

बोब०—कीत्ना, मदा दिखीद खूब मादं दे !

कृष्ण—( रागानें ) काय झणतां गोदीनं 'बाधलंमारलं' बरं आहे ! दिवस उगावयाचे आधीं त्या गोदेची फजीती न करीन तर मी नांवाचा कृष्णच नव्हे !

बोब०—तिती दंमत केदीत पायदे हहह ! ( हंसतो व कुले पिटतो )

कृष्ण—( सर्वांस ) तुझीं जा आपापल्या घरीं, मी तिचा समाचार घेऊन येतों ( स्वगत हंसत )

पद ( आर्य बंधुनों केली ) ही चाल.

असेल निजली निज शयनीं ॥ पतिसह फक्कड ती तरुणी ॥ मन हरणी ॥ मन रमणी ॥ गम्मत करितों जावोनी ॥ धृ० ॥ दाढी वेणीची ग्रंथी ॥ घट्ट मारितों सुटेनशी ॥ ही युक्ती या चित्तीं ॥ जागृत झाली सहज गती ॥ असत्य होईल ना वाणी ॥ गम्मत करितों जावोनी ॥ १ ॥

( निघून जातो. )

पेंद्या—गड्यांनो! आपण चला आपापल्या घरीं जाऊं. कृष्ण गेला तो कांहीं गोदेची खोड मोडल्थावांचून परत यायचा नाहीं. चला कसे लवकर—

पद ( वेणू वाजे त्रिभुवन गाजे ) ही चाल.

पहा सरली रात्र गड्यांनो । पक्षी किल किल स्वर करिती ॥ धृ० ॥ पद्म रसाला मधुप ते टपती । गुं गुं गुं ध्वनी ती करिती; हरिची मुरली जैसी । १ । दिनपती आतां उगवेल वाटे । धेनु दोहण्या त्या व्रजललना नाथा त्यागुनी उठती । १ ।

( जातात )

---

## प्रवेश ६ वा.

स्थळ—गोदेचें घर. पात्रें—गोदा, हणमंता, चिमणी व ठमाजी ( गोदा व हणमंता निजलीं असून दाढी वेणीची गांठ दिलेली आहे असा पडदा उघडतो )

पद ( श्री श्याम सुंदर इंदिरा ) ही चाल.

हणमंता—सटवे तुं सोडि । माझि दाढि । होसि वेडी ऊठ आतां ॥
गोदा—( जागीं होऊन ) धरली हो कोणी
हन०—तूं दिवाणी ।
गोदा—माझि वेणीं का धरितां
हन०—सटवे० ॥ धृ० ॥

गोंदा--काय आळ तरी हा भगवंता
हन०--सोडि दाढि अधीं मारीन लत्ता
गोदा--माझि वेणी कां धरिली नाथा
हन०--दाढि सोडीं। हां न ओढीं
गोदा०--ही लबाडी तुह्मीं करितां
हन०--गे दाढि० ॥ १ ॥

गोदा--हें काय बाई बोलावं! मी तुमची दाढी धरली नाहीं; पण आपण माझी वेणी धरलीत हें मात्र खास.

हन०--अग शिंचे, तुझी वेणी मीं शपथ धरली नाहीं!

गोदा--बाहेर उजेडांत तरी चला. मग कसं काय झालं आहे तें पाहूं! ( घराबाहेर येतात. )

हन०--( पाहून शांत होतो व गोदेस ) अग! तुझ्या वेणीची नि माझ्या दाढीची अगदींच गुंतागुंत झाली.

गोदा--झोपेंत मनष्य लोळूं लागला म्हणजे अशी गुंतागुंत व्हावयाचीच! मेली सोडा सोडा. साफ उजाडलं कुणी पाहतील तर हसतील--सोडा लवकर.

हन०--( प्रयत्न करून ) नाहीं, मुळींच सुटत नाहीं.

गोदा०--सुटत नसेल तर सुरी आणून कापा!

हन०--शाबास दोघेंही बांधलों गेलों आणि सुरी आणणार कोण?

गोदा०--अगबाई! आतां मात्र फजीतीला पारावार नाहीं. शेजारच्या चिमणीला तरी हांक मारा!

हन०--तूंच मार.

गोदा०--( हांक मारते ) चिमणे! अग ए मेले चिमणे!

चिम०--( पडद्यांतून ) काय ग गोदे कां हांक मारतेस?

गोदा०--अग इकडे ये आणि ही कशी गुंतागुंत झाली ती सोडीव तरी!

चिम०--( हातांत खुरपी घेऊन येते व तो प्रकार पाहून ) कोण

ग बाई चमत्कार हा ! मी असलं स्वप्नांत देखिल पाहिलं नव्हतं ! वासराचा चारा कापायला ही खुरपी नेत होते, हिनं तरी कापून टाकते. ( कापते ) छे ! नाहीं कापत !

गोदा०—मेलं विस्तव तरी आणून लाव.

चिम०—[ विस्तव लावून ] नाहीं मेलं ! हा विस्तवसुद्धां या गांठीला जाळीत नाहीं. ( विस्तव नेऊन ठेविते. )

गोदा—मग आमच्यावर देवच कोपला म्हणायाचा.

चिम०—[ पुनः नीट पाहून ] अग, ही गुंतागुंत नव्हे. ही मुद्दाम कुणीं गांठ दिलेली आहे. कायग तूं कुणाला त्रास तर नाहींना दिलास ?

गोदा—काल रात्रीं कृष्ण आपल्या सौंगड्यांसह घरांत दहीं दूध सेवित असतां त्याच्या साऱ्या सोबत्यांना आठवण राहण्यासारखी देणगी दिली होती.

चिम०—तर मग त्या कृष्णाचेंच हें काम, पाहिलीं नाहींत व ऐकिलींहि नाहींत अशीं कामें त्या गुलामानं आतांशीं चालविलीं आहेत.

गोदा—नको बाई. या गोकुळांत आतां राहणं नको. किती मेला त्रास सोसावा तरी ! ( ठमाजी येतो. )

ठमा०—( चिमणेस रागानें ) अंथरुणावरून उठतेस ती गोदेचे घरीं येतेस, काय ठेवलं आहे ग इकडे ? परक्याच्या घरीं जाण्याची तुला फारच संवय लागली आहे पण सांभाळ ! या ठमाशीं गांठ आहे.

चिम०—रागावयाला झालं काय ? गोदेची अन तिच्या नवऱ्याची कशी फजीती होत आहे ती पहा नि मग माझ्यावर आग पाखडा !

ठमा०—( पाहून ) हा काय गोंधळ बुवा ! ( हंसत हनमंतास ) हनमंत्या, काय बुवा हे ! अरे, रात्रीची मस्ती थोडी करावी होतीस. तरणी बायको मिळाली म्हणून रात्रभर तिच्या अंगावरच का लोळत ऱ्हायचं !

चिम०—अहो, त्या यशोदाबाईच्या कृष्णानं ही फजीती केली आहे यांची.

ठम ०—( रागानें ) काय म्हणतेस, त्या कृष्णानं ही गांठ दिली ? किती द्वाड कार्टा ! ( हनमंतास ) हनमंत्या, अरे त्या पोराला ठार मारण्याची एखादी युक्ती तरी लढीव ! पहा-परवां आमच्या घरांत दह्यांची चोरी केली ती केलीच पण आणखी ( चिमणेकडे वळून ) हिचं चुंबन घेऊन निरीसही हात घातला. मी निजलों नसतों तर त्याचा खूनच पाडला असता. किती चोरट्याचा अविचारपणा ! आत्तासा जर माझ्या हातीं मिळेल तर या खुरपीनच कापून टाकीन पापी पोरटा !

हन०—आह्मां साऱ्या गोकुळवासी जनांना त्रास देण्याला जणुं काय त्या नंदाच्या पोटीं हा काळ कुठार जन्मास आला ! याची आतां आह्मी कांहीं तरी तजविज करणार नाहीं तर तो आपल्या बायका सोंवळ्या ठेवणार नाहीं.

गोदा०—चला, अशीच गुंतागुंत घेऊन नंदाच्या घरीं जाऊं, व त्या यशोदाबाईला त्यांच्या त्या पोराचं हें कृत्य दाखवूं.

हन०—आतां हें आमचं जोडपं असंच भर गांवांतून चाललं म्हणजे आमच्या अब्रूची अगदीं कमालच कमाल होऊन जाईल. चल, आग लागो त्याच्या तोंडाला एकदाची !

ठम ०—( चिमणेस ) चलग, आह्मीं सुद्धां जाऊं आणि आमचं गाऱ्हाणं नंदाला सांगूं आज त्या काळ्याला शिक्षा झाल्याविना परत यायचं नाहीं.

चिम०—( बोटें मोडून ) सत्यनाश होवो मेल्याचा ! ( सर्व जातात. )

## प्रवेश ७ वा.

स्थळः--नंदाचा वाडा. पात्रें--नंद, यशोदा, कृष्ण, चिमणी, ठमाजी, मोदा व हनंमता.

( नंद कृष्णास शेजारीं घेऊन बसला आहे असा पडदा उघडतो. )

नंद--( कृष्णाकडे पाहून सहर्ष )--

पद ( अझुनी वेळीच सावध ) ही चाल.

रमवी मन्मन बालक गोंडस बोलत मंजुळ बोला ॥
स्वरूप सुंदर । रिझवित अंतर । हरि माझा भोळा
॥धृ०॥ श्याम रंग हा रंगवि सदना । अवलोकीतां याच्या वदना॥
वाटत हर्ष मला ॥ १ ॥ अंगणिं रांगत । गाई राखत ॥ गडी
सौंगडी । जमवुनि खेळत ॥ सुखवित रंग निळा ॥ २ ॥

यशोदा--( प्रवेश करून ) त्याचं तें वर्णन पुरे करा आणि तो कुठें गेला होता तें आधीं त्याला विचारा !

कृष्ण--( नंदास ) ताता ! रात्रौ मी आईशेजारी निजलों असतां अकस्मात जागा झालों व बाहेर जाऊन पहातों तो उजेडलं दिसलं झणून मी एकटाच कुंजवनांत धांवत गेलों, कुंजवनांत जाऊन बराच वेळ झाला तरी उजाडलें नाहीं. मग उजाडलं तेव्हां घरीं आलों.

नंद--कृष्णा कितीरे तूं धीट ! रात्रीचं कुंजवनांत एकटं जाणं झणजे जिवाशीं गांठ. वेडा मुलगा ! असा रात्रीचा कुंजांत कधीं जाऊं नकोस. वाटेंत भुतं हिंडत असतात, भिशील त्यांना !

यशो०--अहो, तो कुंजांत कुठं जातोय !

पद ( त्यजि भक्तासाठीं लाज ) ही चाल.

व्रज मंदिरिं नित्य जातो ॥ दहिं दूध चोरुनि खातो ॥ धृ० ॥
मजसवें निज शयनीं । परि हळूच उठोनी ॥ हा जात सदा
पळुनि ॥ जमवानि सौंगडी आणितो ॥

व्रज घरीं करी चोरी ॥ भटकतो निशा सारी ॥ हा द्वाड असे भारी ॥ गांवांत गौळणीं छळितो ॥ २ ॥

कृष्ण—बाबा ! जेवढं म्हणून कांहीं आई सांगते तेवढें निव्वळ खोट.

येशो०—बरं बरं, समजेल आतां थोड्या वेळानं !

( बसते. तोंच ठमाजीसह चिमणी येते. )

चिंमणी—( यशोदेस ) यशोदाबाई ! या तुमच्या मुलानं आम्हांला आतां गोकुळांत राहायाला नको असं करून टाकलंय.

ठमा०—या मुलाचा आपण बंदोबस्त न ठेवाल तर आम्ही याला घरांत कोंडून ठेवूं. या तुमच्या मुलासारखा चोरटा गांवांत एकही पोरटा नसेल.

चिम०—बाई—

पद ( कृष्ण असे कुंजांत ) हीं चाल.

कृष्ण छळी आह्मांस ॥ जरा भय दावि तयाला॥धृ॥द्वाड चोरटे मित्र जमवुनी ॥ खातो दहिं, दुध नित्य चोरुनी ॥ शिणवितो अधरोष्ट चुंबुनी ॥ ही करणी बरि याचीका॥भय दावि मुलाला॥१॥

कृष्ण—( यशोदेस ) आई ! या द्वाड चिमणीच्या बोलण्यावर भरंवसा ठेवूं नको बरं ? याचं कारण सांगतों ऐक—

पद ( जननी स्वमन देई ) ही चाल.

कुटिला । असति गोपी । इच्या सह । जारिणी । साऱ्या । कपट खणि ॥ धृ ॥ कुंजवनीं मी जातां माते ॥ नेति ग मंदिरीं ॥ १ ॥ भल भलत्या ह्या करिती लीला ॥ धरिति ग गालां ॥ २ ॥

( इतक्यांत गोदेचें जोडपें येतें )

गोदा—( यशोदेस ) अहो यशोदाबाई ! ही पहा तुमच्या कृष्णानं कशी विलक्षण कृती केली ती !

यशो०—काय बाई म्हणतेस ! काय माझ्या कृष्णानं केलं ?

गोदा०— पद ( येजि जावो सजन ) ही चाल.

द्वाड बाई हरी तुझा फार ॥ झोंबुनि आह्मां करि बेजार ॥धृ०॥ मोठा मोठा ग जार ॥ नाहिं आम्हांस थार ॥ गोपी आह्मि लाचार ॥ पातिसह शयनीं ॥ निद्रित असतां मी । दिली यानें ग्रंथि दाढि वेणीची । गेली सारि अब्रु माझी दारोदार ॥ गोपी ॥ २ ॥

हन०—( नंदास ) महाराज, या मुलाची तुमच्यानं खोड मोडवत नसेल तर आम्हांला हें गोकुळ सोडलें पाहिजे. फजीतीच केली आमची यानं आज—

नंद—काय म्हणतां ? माझ्या कृष्णानं तुमची फजीती केली ? नाहीं. असं माझा कृष्ण करील तरी कसं ?

हन०—कृष्ण जर करीत नाहीं तर हें झालं कसं असं ?

यशो०—नाहीं बाई हरला उपाय ? या द्वाडामुळें रोज उठून लोकांची गाऱ्हाणीं मात्र ऐकावींत ? ( आंत जाते. )

नंद०—कान्हा ! तुझे हे अवगुण ऐकावेत तरी किती ? आपलें घर सोडून दुसऱ्याच्या घरीं जायचं. त्यांचं गोरस चोरून खायचं आणि त्या निजल्या असतां त्यांचा छळ करायचा. व अशी ग्रंथि देऊन त्यांची फजीति करायची हे तुला कुणी शिकविलं ? वेडा ! अरे दुष्ट चाळे करण्याचें आजपासून बंद कर.

यशो०—( दोरी घेऊन येते व कृष्णाचे हात बांधीत बांधीत ) दाढी वेणीची गांठ द्यायचा, त्यांची मस्करी करायचा व दूध दहीं चोरून खायचा नाद रे कुणीं लावला तुला ?—

पद. ( बाप तो ताप मज छळितो ) ही चाल.

किती तुला रोज शिकवावें । किती बोधावें । किती जाचावें ।
कितीदा बांधुनि ठेवावे । त्रासुनि कितिदा तुलारे मारावें ॥ धृ०॥
सतत दिनीं गवळणी येउनी ॥ गाऱ्हाणीं तव जाति सांगुनी ॥
अवगुणी होउनी । खासि तुं दहीं चोरुनि ॥ किती ऐकावें ।
किती सोसावें ॥ किती तुज सांगावें ॥ १ ॥

**कृष्ण**—आई ! हें माझ्यावर तुफान—खरोखरच तुफान. ह्या दाढीवाल्या बोकडानं आणलं आहे. अग असं पहा आधीं, जर स्त्रीसह नवरा झोंपला असेल त्यांच्या दाढीवेणीची गांठ कुणाच्यानं देववेल काय ? आणखी तुला ठाऊक नसेल तर सांगतों; पण आधीं माझे हात सोड. ( ती सोडते ) आतां ऐक—

पद. ( परमार्थाचा हा पंथ ) ही चाल.

**सुदर सुंदरीला ॥ कांत न मिळे जरि चांगला ॥ धृ० ॥ तरि ती इच्छित नर तरणा ॥ विज मनिं अठवित मनरमणा ॥ शयनिं पाहिना पतिवदना ॥ मग खवळोनी । दाढी॰ वेणी । भांडती । अतिझुंजती । बल दाविती ॥ गे भांड० ॥ १ ॥**

आणि कुणीं गमतीखातर दिली असती तर घरच्या घरींच सुटली नसती का ? पण यांचा हेतु कुठून तरी मजवर आळ आणायचा, ह्मणून हीं नवरा बायको लज्जा सोडून गांवांतील लोकांना दाखवीत दाखवीत येथवर आलीं; पहा ही ग्रंथिका मी एका क्षणाचे आधींच सोडून दाखवितों. ( हात लवतांच गांठ सुटून )

**नंद**—( रागानें ) या गवळ्यांच्या बायका अगदीं नीच ! माझ्या मुलावर खोटा आळ आणून आपला सभ्यपणा दाखवायला इथं आल्या. खरोखर ह्या गोपींची लबाडी आज उघडकीस आली. ह्यांच्या कृतीवरून कृष्ण कधींच यांच्या घरीं जात नाहीं हें सिद्ध होतें.

**चिम०**—चढवा आणखी मुलाला हरभऱ्याच्या झाडावर. त्या दिवशीं त्या यमनीच्या चोळीस हात घालून निरी सोडली ती याच तुमच्या सद्गुणी मुलानं.

**यशो०**—या पोराला या वयांत स्त्री पुरुष संबंध कसा कळेल बरं ? शिकस्त झाली बाई तुह्मांपुढें ! माझ्या मुलावर विनाकारण भलभलतं आळ आणायला तुह्मांला लाज नाहीं कां वाटत ? ( कृष्णास ) चल

बाळा घरांत. थोडासा दहिंभात खा, नि गोपाळासंगे गाईना घेऊन चरायला जा.

नंद०—( कृष्णास ) जा; दुसऱ्याची खोडी करण्याचें वेड सोडून दे.

गोदा०—(नंदास) न्यायाधिशांनीं न्याय असाच का निवडायचा ?

नंद०—( संतापून )

पद ( जा जा झणीं सदनांतुनी ) ही चाल.

जा जा घरीं। लज्जा वरीं।

कृष्ण—गे जा जा जारिणी ॥

नंद—जा जा ॥धृ०॥

गोदा—( कृष्णास ) जार खरा तूं चोरा। चोर जारा ॥

कृष्ण—निमुटपणें जा डाकिणींना तर घालविन लोटुनी ॥

नंद—जा जा० ॥ १ ॥

यशो०—( कृष्णास ) कजाग काला। करि न मुला। द्वाड द्वाड ह्या गौळणी ॥

नंद—' चोर जार ' बालका बोलती।

चिम०—( नंदास ) स्कंध ठायि घ्या बाल दुर्मती ॥

कृष्ण—( चिमणीस ) ही जारीण मोठी। बुद्धी हीची खोटी ॥

यशो०—( कृष्णास ) बाळा चिडूं नकोरे। आशिवाहि कोणा वदूं नकोरे

गोदा—खोडि करित नित।

चिम०—चोरित नवनित ॥

कृष्ण—( दोघींस ) जा जा आतां। मारिल तात ॥ लाथा येऊनी ॥

नंद—जा जा ॥ २ ॥

( असें ह्मणून कृष्णास घेऊन आंत जातात. )

चिम०—( गोदेस ) गोदे ! पहा बाई सत्याचा न्याय नाहीं ! कितीग लबाड तो काळा ?

हन०—अग शिंचांनो ! काळा सोडून काळ्याचा बाप, आजा,

पणजा, कां लबाड असेना ? तुह्मी आपल्या पातिव्रत्यापासून ढळूं नका. तुह्मी आपापले कासोटे घट्ट मारा मग तो तुमचें काय करणार ? चला घरीं, पाहून घेऊं त्या कार्ट्याला.

**ठमा**—चला, तोंडांत बोळा घालून ठारच मारूं चोरट्याला.

( जातात. पडदा पडतो )

---

## प्रवेश ८ वा.

**स्थळ**—मथुरेस जाण्या येण्याचा रस्ता. **पात्रें**—कृष्णासह सौंगडी गोदेसह गौळणी व यशोदा. ( कृष्ण सौंगड्यांसह प्रवेश करतो. )

**पेंद्या**—( कृष्णास )—

**पद** ( अरे बघ गाई बुजाल्या ) ही चाल.

अरे हरि गडी भुकेले । अधीर झाले । सु-अन्न स्वादें जाण ॥ ( गड्यास ) निवांत कारे । रडू नका रे ॥ धरा हरीचा कान ॥ धृ० ॥ सर्व—या सु-अन्ना । देइ कान्हा । खचीत जाती प्राण । पेंद्या—अत तूं हरी । बघसि किति तरी । सौंगडि वाणी मान ॥ झणीं तें अन्न दयाळा आण ॥ १ ॥

**कृष्ण**—(सर्वांस) गड्यांनो! आपल्या त्रासानं पळून गेलेले गोकुळांतील ब्राह्मण, आपल्या कुटुंबांसह या दक्षिणांगाच्या अरण्यांत येऊन, अनुष्ठानें करून देवतांस तृप्त करण्यासाठीं ते आपल्या स्त्रियांकडून ही मिष्टान्नं तयार करवीत आहेत, त्यांचा हा स्वाद.

**वाक०**—तर मग तें आपल्याला मिळणं दुर्लभच. ?

**कृष्ण**—दुर्लभ कां (वडज्यास) वडज्या, पेंद्याखेरीज करून सर्व गोपांस बरोबर घे, आणि या गंधाच्या धोरणानं जाऊन ब्राह्मणांजवळ मीं अन्न मागितलं आहे म्हणून सांगून ते देतील तेवढं घेऊन ये जा.

वड०—ठीक आहे, हें माझं काम (सर्व गोपांसह जातो.)

पेंद्या—ऐकल्यासारखें करून ( कृष्णास ) कृष्णा, हा इकडून कोमल स्वर कुणाचा ऐकूं येतो रे ?

कृष्ण—( कानोसा देऊन )—

दिंडी.

व्रज अंगना ह्या दधीं विकायाला ॥ नटुनि थटुनी बघ ज्याती मथुरेला ॥ प्रिय पेंद्या चल हो पुढें अधीरे अडवुं त्यांना करूं विटंबना बारे ॥ १ ॥

चल चल, त्या आल्याच, दे मजजवळ चेंडू.

पेंद्या—चेंडू कशाला ?

कृष्ण—अरे, आपण दोघे रस्त्यावर चेंडूफळी खेळूं. मग त्या आपल्या तावडींत सांपडल्याच.

( जातात. नंतर डोईवर दह्यांचीं मडकीं घेऊन गौळणी येतात. )

गौळणी पद ( ह्मणिं जाऊं चला ) ही चाल.

कुणिं गोविंदु घ्या । कुणिं गोपालु घ्या । कुणिं नंदाचा हरि वनमाळि घ्या ॥ धृ० ॥ कंद सुखाचा । मुकुंद गुणाचा ॥ कुणि घ्या गे कृष्णाला ॥ या ऽऽऽघ्या ॥ १ ॥

( असें ह्मणत जातात. गोदा मागें राहते )

कृष्ण—( धांवत येतो व तिला अडवून ) अग ए चोरटे ! आह्मी खेळत असतां आमचा चेंडू निरींत लपवून आतां पळतेस काय. पळ पाहूं कशी पळतेस ती ?

( तिच्या चोळीस हात घालून निरी ओढतो )

पेंद्या—( धांवत येऊन कृष्णास ) कृष्णा, सोड तिला ती पहा यशोदा आई ! ( कृष्ण तिला सोडतो तोंच यशोदा येते. )

यशो०—( कृष्णास ) वत्सा ! इकडे येऊन तुला किती बरं वेळ झाला ? तुला जेवायला नको का ?

कृष्ण—होय आई, पाहिजे; पण या टवळीनं माझा चेंडू लपविला तो मला देत नाहीं पहा !

गोदा—( यशोदेस ) यशोदाबाई ! मीं याचा चेंडू खचीत लपविला नाहीं !—

पद ( जगदीश्वर सर्वत्र भरला ) ही चाल.

मी जात असें मथुरेला ॥ हें दुग्ध दधीं विकण्याला ॥ धृ० ॥ परि कृष्ण मदिय वसनाला ॥ धरुनियां झोंबे अंगाला ॥ द्वाड हा-किती गे ॥ कर लावीत कंचूकीला ॥१॥ मी सासुरवासि हें कळेना का यासि-हा व्यर्थ मज जाचि-करुं काई ॥ जरि कथीन हें मत्पतिला । तरि दंडिल तो तव हरिला ॥ २ ॥

यशो०—( कृष्णास ) बाळा कां बरं व्यर्थ तिच्या वसनाला झोंबतोस ?

कृष्ण०—आई—

पद० ( निद्रे येई झर्णी ) ही चाल.

चेंडू फाळि आतां ॥ खेळत असतां ॥ धृ० ॥ हि आली गोपकांता ॥ बळेंच धरुनी माझ्या हाता ॥ चुंबित वदना ॥ म्हणे ये सदना ॥ ' रात्रीं गुणवंता ' ॥ १ ॥

गोदा—खोटें नच वद । वच; मज अडविसि मी जातां ॥

कृष्ण—चेंडू ॥ १ ॥

आणि हिच्या जवळ माझा चेंडू आहे किं नाहीं तो बघ हं ! ( तिची निरी ओढतांच चेंडू पडतो.

यशो०—( रागानें ) शर्थ झाली बाई ह्या गोळणींची ! उगाच पोरावर भल भलते आळ आणतात. ( कृष्णास ) बाळा, चल घरीं. ह्या द्वाड स्त्रिया काय करतील हें कळूं दिखील द्यायच्या नाहींत.

कृष्ण—आई, तूं पेंद्यासह पुढं चल, मी गाईनां घेऊन येतों.

( जातात )

गोदा—काय आश्चर्य बाई ! मी चेंडू नीरींत ठेविला नसतां मज-जवळ सांपडावा कसा ? कृष्णानं जादुविद्यचा प्रयोग केलान काय ? आह्मां गौळणींना इतका कृष्णाचा त्रास असतांही, रात्रं दिवस मेलं चित्त

त्याच्याकडे धांव घेतं. तो पळभर दृष्टीआड झाला कीं मन वेडावून जातं ( कृष्णाची मुरली वाजते ) ह्या मुरलीनें तर अगदीं गांगरून टाकलं वर पाहून अगबाई ! अस्तमान होत आला. सौंगडणी विक्री करून परत घरींहि गेल्या असतील. आतां हें माझं दहिं दूध कुणाला देऊं.

( जात असतां 'कुणि गोविंद ध्या' हें पूर्वोक्त पद ह्मणून जाते. )

---

## प्रवेश ९ वा.

**स्थल**—कुंजवन **पात्रें**—कृष्ण, राधा, बोबड्या व गोपगोपी ( कृष्ण राधेला अडवीत येतो. )

राधा—( रागानें )

पद ( जावो जावो छयला ) ही चाल.

जाइ जाइ कान्हा त्रासी जाचि मला ना ॥ धृ० ॥

कृष्ण—( हंसत ) करिं नच रंग । धरि मम संग ॥ ( तिचा हात धरतो )

राधा—जाइ जाइ । कर न धर न । वचना । वद तुं जा ॥ (पळते)

कृष्ण—( धांवून ) तदिय सु-रंग । करि मन दंग ॥

राधा—त्यजि मम छंद । वरि नच फंद ॥

कृष्ण—राधे राधे । सन्निध ये । चुंबन दे दे ॥

( जवळ जातो )

राधा—( लोटून ) जाइरे निसंगा ॥ स्पर्शना मदंगा ॥ पुतनारी । हो दुरी । छळि न भारी । श्रीहरी ॥ ( जाऊं लागते )

कृष्ण—( धरून ) राधे ये रंगा । घालिं तुं पिंगा । शांतविं अनंगा ॥

राधा—( लोटून ) जाइ जाइ । कर न० ॥ २ ॥

कृष्ण—पद ( छांडो छांडोजी मोरे ) ही चाल.

राही घडिभर राधे उभी गे सुरंगे फीर मागें न जाइ दुरी रागे ॥ धृ० ॥

राधा—ना धरी करा ॥

**कृष्ण**—नच करी नखरा ।

**राधा**—हरि सोडि मम करा ।

**कृष्ण**—हरि मदिय स्मर जरा ।

**राधा**—छळी न जारे ॥ १ ॥ सोड हरि मला जाउं देरे घरा । नसे शरम कशि तुला ।

**कृष्ण**—सखे चुंबिन मि गाला ।

**राधा**—छळि न जारे ॥ २ ॥

**कृष्ण**—राधे, रागाचा पर्जन्यच पाडलास माझ्यावर ! अलीकड मी तुझ्या घरीं बरेच दिवस आलों नाहीं ह्मणूनच का ही इतकी रुसलीस ? हें बघ राधे, मी रोज तुझ्या घरीं येईन; पण तूं मोठी म्हणून मन किंचित भय पांघरतें !

**राधा**—(हंसून) लबाडाच्या मनांत शंका तरी किती ? कृष्णा, आठा चार दिवसांनीं तरी माझं संगसौख्य सेवावंस ? अगदींच कारे पारकं व्हावं ? हें बघ कृष्णा, तूं एक रात्र शेजारीं नसलास कीं, मला कसंसंच वाटतं. गुडग्या गुडग्या रांगत, खेळत माझ्या घरांत येऊन माझं अधरोष्ठ चुंबन तूंच नारे करींत होतास लहानपणीं ?

**कृष्ण**—होय, अधरोष्ठ चुंबीत होतों, तुला आलिंगित होतों आणि तुझें कामवासनेचें फळही तुला तात्काळ देत होतों; पण त्यावेळीं मी कधीं कधीं मोठाही होत होतों आतां खरं म्हणशील तर तो तेव्हांचा माझा सारा पोरखेळच होता.

**राधा**—बरं आतां मोठा झालास, अजूनही नाहीं का' राधा विलास' नाटकांत नाचावयाचं तुला !

**कृष्ण**—कसा नाचूं ' राधाविलास नाटकांत ? '

**राधा**—जशी मी नाचेन तसा तूंही नाज व या अशा रात्रीं या कुंजांतच माझ्या प्रबळ कामेच्छेची तृप्ती कर.

**कृष्ण**—नाच पाहूं कशी नाचतेस ती. अगदीं मंद पाउलं टाकशील तर मी मंदच नाचेन.

( राधा खालील पद म्हणत नाचते. तसाच् कृष्ण नाचतो. इतक्यांत बोबड्या येऊन वेडा वांकडा नाचतो )

राधा —

पद ( यदुराया तव पायींची धूळ ) ही चाल.

श्रीरंगा । करि दंगा । मी रंगी असे ॥ मन भृंगा । ये रंगा । मी रंगी असे ॥ धृ० ॥ कुंजविहारी । वाजवी मुरली । करि छंदा ।गोविंदा । मीछंदि असे ॥ १ ॥ काम न धंदा । नाच मुकुंदा । मुचकुंदा । आनंदा मी फंदी असे ॥ २ ॥

(नाच आटपून बोबड्यास) तूंरे मेल्या मध्येंच नाचायला कुठून आलास?

बोब०—दाधे, तुद्या पायांतल्या पैद्नाता थुम् थुम् घुम् धुम् आबाद् ऐकूं आदा म्हनून मी दिखीद् नादा यदा धांवत आदों, ( नाचतो )

कृष्ण—पुरे कर नाचणं तुझं बोबड्या ! ( राधेस ) राधे तुझी नृत्यकला पाहून मी तुला प्रसन्न झालों. आतां या कुंजवनांत पुरी सहा महिन्याची रात्र करून तुझ्याशीं रास खेळतों.

( असें कृष्ण म्हणत आहे तोंच रासक्रीडेचा देखावा दिसतो. त्यांत कृष्ण, राधा व बोबड्या गेल्यावर रास सुरू होतो. )

गोपगोपी—गोपाल कृष्ण महाराजकी जय —

पद ( सुगुणि वरातें मुली वश ) ही चाल.

कुंजाविहारी मुरारि असुरारी ।प्रसंग वारी प्रलंब मारी। वज्रास तारी ॥ धृ० ॥ यदुवतंसा । सुगुण हंसा । मनप्रकाशा । जय सुरेशा । सुरूप सुंदर सुशांत अंबर । सुरेख श्रीवर । सुरंगधारी । वेणू वाजावि । अंबर गाजावि सुरांस लाजवी ॥ १ ॥

कृष्ण—राधेसी रमतां वरित ममता चित्ता
सुख मनवरी । रंगणी सुख संगरीं
सुगोप कुमरी भारि सुखी अंतरीं ॥

गोपी—कुंजवननिवासा पुरीव आशा SSSSS

गोप—जयजय प्रभुवर, भवभय, अघहर ॥ २ ॥

दुसरा अंक समाप्त.

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**—मथुरा बंदीशाळा. **पात्रें**—वसुदेव, देवकी व कृष्ण.

( वसुदेव निद्रिस्त असून देवकी वाण तयार करून बसली आहे असा पडदा उघडतो. )

**देवकी**—आज पितृतिथी अमावास्या, तेव्हां जिकडे तिकडे भाग्यवान माता आपापल्या पुत्रांना पुजून वाण देत आहेत. मीच काय ती सात पुत्र विऊन वांझ ! आठवा झाला तोही तसाच अंतरला ! चांडाळ कंसानं सहाही बाळं मारलीं ! आज वाण ध्यायाला एकही उरलं नाहीं ! ( कृष्णास आठवून )

**पद**—चाल ( कैसी दुःखा साहूं )

**अहा । बाळा । माझ्या । आठव्या हरि केशवा ॥ परदेशीं । विदेशीं । करुनि मला । जासी गोकुळीं मुला ॥ धृ० ॥ सुपुत्रवंती असतां मीही । वाण कुणाला हें देऊं ॥ धांव दयाळा घननीळा । येई आपुल्या वाणाला ॥ सांग यशोदा नंदाला ॥ जातों धांवत मथुरेला ॥ येई-येई-माधवा ॥ १ ॥**

माझं पूर्वकर्म ओढवून सध्या मी घोर पापाची फळं भोगीत आहें पूर्वजन्मीं मी गाईवत्सांची ताटातूट केली किं, मृगीचीं पाडसं मारलीं—किंवा ऋषींचा मानभंग करून माता, पिता सद्गुरू यांना कमीपणानें शब्द बोललें कांहींच कळत नाहीं, वैकुंठनाथा ! ही बंदीशाळेची व्यथा मी कंठावी तरी किती दिवस ! ( रडते )

**कृष्ण**—( प्रवेश करून मनांत ) मी राधेशीं रास खेळत असतां या

देवकी मातेचे करुणशब्द माझ्या कानांत पडले म्हणून मी क्षणाचाही विलंब न लावतां इथें आलों. ( देवकीच्या पाठीमागें उभा राहतो. )

देव०—( वाण विस्तारून ) जिथं माझा बाळ असेल तिथं त्याला हें वाण पावो. ( वाण वर उचलून ) अतीत कोण आहे का ?

कृष्ण—( मागून प्रकाश ) सर्वातीत मी आहें. जीव, शिवाचा जो अतीत आणि पिंडब्रह्मांडविरहीत तोच मी तुझा पुत्र असून, आतां वाणही मलाच दे. ( घेतो व खाऊं लागतो. )

देव०—( मागें पहाते आणि विस्मीत आणि तटस्थ होऊन कोमल स्वरानें ) कुणाचा बाळ, बाळा तूं ? माझा कृष्णही तुझ्याचएवढा झाला असेल !

कृष्ण—( हंसत ) माते ! तोच मी तुझा पुत्र. माझंच नांव कृष्ण ! ( इतकें तो म्हणत आहे तोंच देवकीच्या स्तनीं पान्हा फुटतो. )

देव०— ( गहिंवरून ) माझ्या छावड्या ! माझा कृष्ण तूंच काय ? (पोटाशीं धरून स्तनपान करते. इतक्यांत वसुदेव जागा होतो. )

वसु०—( देवकीस ) देवकी कुणाला ग स्तनपान करीत आहेस !

देव०—नाथा माझ्या कृष्णालाहो ! गोकुळांतील बाळाचीं नाना चरित्रें आपण ऐकत होतों, तीं आज या माझ्या राजीवनयनानं खरीं करून दाखविलीं.

वसु०— ( कृष्णास पोटाशीं धरून स्फुंदत )-

पद ( कोई हाल कहो जाके ) ही चाल.

जनका, जननिस भेटाया ॥ येसी अजि तनया ॥ धृ० ॥ गोकुळिं टाकुनि बहु दिन झाले ॥ त्यापासुनि मीं तुज न पाहिलें ॥ खेळविलें ना अंकिं घेतलें । नाहिं तुला यदुराया ॥ १ ॥

बा माझ्या शामसुंदरा, इथें तूं आलास तरी कसा ? तुला कुणी पाहिलं नाहीं काय ?

कृष्ण—अविद्यामय प्राणी जे देहबुद्धीनें वेष्टून गेले त्यांना मी कसा

दिसणार ? जे भक्त ज्ञानी असतील तेच मला ओळखतील ? अस्तु, तुम्ही आतां शोक न करतां कांहीं कालवर स्वस्थ असा तुमची मुक्तता मी लवकरच करीन. ( जाऊं लागतो. )

देव०—( मागें धावून )—

पद ( हांरे सय्यां पडूं मैतोरे ) ही चाल.

येरे बाळा। येरे घननीळा। तुझ्या या मुखा चुंबितें ॥ धृ० ॥

कृष्ण—मम विरहातें त्यागी तूं गे माते। स्मर देवातें, जाऊं दे गे माते ॥

वसु०—त्यजोनि कां रे जासी ॥ दया न तूतें कैसी ॥

कृष्ण—प्रभु भजनीं। जा गढुनी।

वसु०—ठसत मनीं। तव वाणी ॥

देव—ये बाळा ॥ १ ॥

( कृष्ण जातो पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा.

स्थळ—मार्ग.

**नारद**—( प्रवेश करून ) कृष्ण-कृष्ण-कृष्ण ! अलीकडे परभाषा त्रयगुणी विद्वानांनीं कृष्णाला ‘ चोर, जार, कुटिल ’ ठरवून त्याची बाल-क्रीडा कानांनीं ऐकूं नये, असा लोकांना कित्ता घालून दिला. परब्रह्म सनातन श्रीकृष्ण परमात्म्याचें वर्तन नीति विरुद्ध कोण ह्मणेल ? त्या महा पुरुषाला नीच ठरविणं हें शुद्ध महत्पाप होय. गोप केवळ इंद्रिय आणि त्यांचा आत्मा श्रीकृष्ण भगवान्, गोपी देह मनःकमलाच्या पाकळ्या व त्यांचे भ्रतार काम क्रोधादि मनोविकार. अस्तु, त्याची वाटाघाट नकोच आपल्याला; आपलं कर्तव्य आपण करावं !

पद. ( जोगी आनाया ) ही चाल.

मनाऽऽऽ देई बरी हरि वासना ॥ गिरिधारी । मुरारी । तूं तारी जनां ॥ धृ० ॥ मन नादान मदा कदा वरो ना वामना ॥ मन आनंद सुधा कदा त्यजो ना वामना ॥ मन ना फंदि पडो, जडों प्रभूच्या गायना ॥ मन ना छंदिं बसो, फसो ना साधना ॥ ममरे मना । गा गायना । सुख भंगिना ॥ १ ॥ [ जातो ].

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळः**—दरबार. **पात्रें**—कंस, चाणूर, मुष्टीक, खल, तोशल, अक्रुर, नारद, वसुदेव, देवकी, चोपदार व नाचणाऱ्या मुली राक्षस, वगैरे ( कंस सिंहासनावर बसला असून पुढें नाच होत आहे असा पडदा उघडतो. )

**मुली—पद** ( दावर दादार ) ही चाल.

सुजन पाल । कुजन काल । नृपाल । ऽऽऽऽऽऽ प्रभु भूपाल । विशाल । दयाल । सतत । स्वपदिं । स्वअरि नमविं । रमवि असुर । अतुर सुमन । अनुदिनीं ॥ धृ० ॥ सबल कंस भूपा ॥ वरि सु-नय त्यजुनि कोपा ॥ असुर पालका ऽऽऽचरणिं शरण कुमरि सुमति ॥ १ ॥

( जातात. )

**कंस**—काय करावं ! माझा शत्रु गोकुळांत शुक्लेंदुप्रमाणं वाढत चालला त्याच्या नाशास्तव आजपर्यंत अगासुर, बगासुर शंकरासुरादि केशीसारखे मोठे माठे वीर गेले, परंतु ते सारे मृत्युमुखीं पडले. आतां या उपर माझा स्वतःचा विचार मला ठीक दिसत नाहीं.

**अक्र०**—( मनांत ) आंगांतील वेड जात नाहीं. .

**चाणूर०**—भूपते, आपण असे चिन्ताक्रांत न बसतां मला आज्ञा द्या, कीं शत्रूचा नाश करून येतों.

**अक्रु०**—तिथेंच मरतों.

**कंस**—चाणूरा, काय करूं ? सर्व सुखाचा अनुभव घेत असतां एकाएकीं आठव्याचं स्मरण झालं कीं आंगांत थरकांप भरतो व तेणेंकरून मी अगदीं वेडावून जातों !

**अक्रु०**—मरणाची वाट पहातों !

**मुष्टि०**—सरकार, कोणती तरी नवीन युक्ती योजुन आधीं त्या काळ्याचा नाश केला पाहिजे.

**अक्रु०**—त्याचा मार खाल्ला पाहिजे.

**कंस**—हें मी प्रथमपासूनच जाणतों; पण उपयोग काय ? आज दिनपर्यंत माझे बलाढ्य दैत्य गेले, त्यांच्यानं ह्या काळ्याचा नाश करवला नाहीं हें तुह्मी सर्वजण पहात आहां !

**अक्रु०**—सर्वजण पहातच आहां ?

**शल**—पृथ्वीपते, मला आज्ञा दिल्यास मी त्वरित गोकुळांत जाऊन त्या काळ्याला काखेंत घालून घेऊन येतों.

**अक्रु०**—तिथूनच स्वर्गास जातों.

**कंस**—छे तझ्याकडून तसं होणं कठीण, कारण तुझ्याहून बलवान राक्षस त्यानें झुंज खेळून आपटून मारिले आहेत.

**अक्रु०**—उभेच चिरले आहेत.

**तोशल०**—महाराज, मला असं वाटतं किं, सर्वांनीं एकदम जावं व गोकुळास वेढा देऊन वैऱ्यावर छापा घालावा म्हणजे आपलं राज्य खचीत निष्कंटक होईल.

**अक्रु०**—लवकरच लयास जाईल.

**कंस**—छे ! अशानं अपजय येईल.

**अक्रु०**—श्रीकृष्ण भगवान् सर्वांना गिळून खाईल.

**कंस**——मी सांगतों असें कराल तरच तो मरेल.

**अक्रु०**—सर्व संकटांतून तो तरेल.

**सर्व**—सांगा सांगा. सांगाल तसें करण्यास आह्मीं तय्यार आहों.

**कंस**—**पद** ( तेतें मना आजि असेंचि जावें ) ही चाल.

यत्नें प्रयत्नें अरितें धरावें ॥ मुष्टिप्रहारें तयाला वधावें ॥ धृ ॥ जारे विरांनो गोकुळ बुडवा ॥ नंदादिगोपां निज पायिं तुडवा ॥ १ ॥

**अक्रु०**—असं करून शेवटीं आपापल्या स्त्रियांना धाय धाय रडवा. काय हा कंसाचा विचार! कंसा, तुझी अक्कल गेली कुठं? चाणूर, मुष्टिक नाचतात तसा तूं नाचतोस. शल, तोशल, सांगतात तसं तूं करतोस; पण सांभाळ, येणारी वेळ कठीण आहे. तुझा कंठ श्रीकृष्ण भगवान चराचरा चिरील तेव्हां तुला, तुझ्या कृत्यांची स्मृती होईल. पित्याची आठवण येईल. तुझ्या पश्चात तुझा स्त्रीमेळा वक्षःस्थळ बडवून घेईल, तुझ्या नावानं रडेल! कित्येक जणी तुला शिव्या शाप देतील. पोटीं संतान नाहीं म्हणून धडाधड अग्नींत उड्या मारून आपापला शेवट करून घेतील! ( वर पाहून ) ईश्वरा अझून तरी या चांडाळाच्या मनांत प्रेरणा करून यांना सद्बुद्धि दे! याच्या अंगांतील पापाचा मळ लयाला ने! छे: याचं आयुष्यजल आटतच आलं तेव्हां तुझ्याकडे दोष नाहीं!

( इतक्यांत नारद प्रवेश करितो. )

**नार०**—( कंसास रागानें ) कंसा! अरे तूं जागृत आहेस का निद्रित आहेस? काय ह्मणावं तुला! अरे, आजपर्यंत ज्यानं तुझे बलाढ्य वीर आपटून, फाडून मारले तो तुझा शत्रु अरे तुझा काळ या मथुरेंत येऊन जिवंत जावा काय? अरे तुझ्यासारखे अंध राजे राजलक्ष्मीच्या गळ्याला दोरी बांधून लवकरच तिला शत्रूच्या स्वाधीन करतील, यांत शंका नाहीं; काय आश्चर्य पहा! शाबास!! अशा अवस्थेनं तुला लवकरच दक्षिण दिशेचा मार्ग क्रमावा लागणार!!!

**कंस**—( शंकित होऊन ) काय ह्मणतां मुने, शत्रू मथुरेंत येऊन—

गेला ? काय हें गौडबंगाल ! महाराज, तो कोणत्या कामानिमित्त आला असावा बरं ?

**नार०**—( शांत होऊन ) अरे कालची मित्रतिथी अमवास्या ना ?

**कंस**—होय. हें आहे मला विदित.

**नार०**—रात्रीं देवकीनं बंदीशाळेंत वाण तयार करून पुत्राचा धांवा केला; तेव्हां तो गोकुळाहून सत्वर येऊन आपलं वाण घेऊन गेला.

**कंस**—( संतापून ) काय; वाण घेऊन गेला. ( ओरडून ) इतकं होईपर्यंत पहारेकरी राक्षस निजले होते का मेले होते ? थांबा, हरामखोरानों , या कृत्याबद्दल तुम्हां सर्वांना हत्तीच्या पायीं बांधून ठार मारतों. अरे कोण आहे ? ( राक्षस पुढें येतात ) जा वसुदेव–देवकीस इथें घेऊन या. ( मल्लांस ) चाणुरादि वीरहो ! वसुदेव देवकी इथें आल्यावर मजसमक्ष त्यांचीं शिरें घडापासून वेगळीं करा. ( दांत चावून ) अरे तो उग्रसेन महाकपटी आहे; करितां त्यालाही बांधून इथं आणा. व माझ्या नेत्रांसमोर थेरड्याचा शिरच्छेद करा. जा सत्वर. ( राक्षस गेल्यावर नारदास ) मुने, या बसा.

**नारद**—( मनांत ) आंतां इथं बसणं ठीक नाहीं. हेच नारद कळलावे असें ह्मणून कुणी तरी तंबी द्यायचे; ( प्रकाश ) कंसा, मला बसण्यास अवकाश नाहीं, आतां स्वस्थानीं जातों. ( मनांत वसुदेव देवकीस व उग्रसेनास कंस ठार मारणार, तेव्हां श्रीकृष्ण भगवान काय चमत्कार करून दाखवितात तो आपण शांतपणानें ऊर्ध्वपंथेंच पाहूं. ( जात असतां )

**पद**—चाल ( या मना समान कोणी )

वासुदेव कृष्णदेव सदय सांवळा ॥ धृ० ॥ सबळ गोवळा ॥ यदुवसंत । व्रजि पसंत । घेई कांबळा ॥ कुंजांत वसत नित । गोपिंस दावित । सकळ कळा ॥ दधि चोरित ॥ गाई चारित । तारित व्रज, अघ वारित । लावि लळा ॥ १ ॥

( जातो. नंतर वसुदेव, देवकी व उग्रसेन यांस राक्षस घेऊन येतात )

**कंस**—( त्यांना पाहून मल्लांस )

### श्लोक.

मारा ठार अधीं हि नीच भगिनी, बुचडा करें ओढुनी ॥ वसुदेव बगळा गिळाच सगळा, माझ्या सले लोचनीं ॥ हा हा नीच असे पिता किं माझा; ठेवा खला बांधुनी ॥ घ्या घ्या खड्गा करीं चिरा झणीं या, टाका तिघां मारुनी ॥ १ ॥

( हे शब्द ऐकून वसुदेव देवकी मूर्च्छित पडतात )

**उग्रसेन**—( एकदम क्रोधानें लाल होऊन कंसास ) कंसा ! अरे कुलांगारा ! हे तुला मरणाचे डोहाळे आठवले आहेत रे ! माझ्या पश्चात तूं ह्या राक्षसांच्या मोहनी जालांत अडकून राज्याची धुळधाण करशील ! साक्षात शेष नारायण चे अवतार राम, कृष्ण तुझ्या कंठ रुधिरानें सारें मथुरापट्टण, पार चिंब भिजवून टाकतील ! तुझ्या या दांडग्या मल्लांस पायीं धरून आपटून मारतील ! तुझा तो विजय मुगुट लाथेखालीं घालून पिष्ट करतील व या तक्तावर विराजमान होतील ! म्हणून म्हणतों, अझून तरी ताळ्यावर येऊन हे तुझे वेडेचार सोडून दे ! वसुदेव, देवकीस शरण ये ! त्यांच्या जवळ जीवदान मागून घे !

**देव०**—( सावध होऊन कंसास )—

### पद. ( दे सदया अनाथ नाथा ) ही चाल.

कंस खला असुरपाला । घाला तुवां आणिला ॥ धृ० ॥ बंधो नृपा विशाला । प्रेमा तुझा निमाला । शुद्धा वरा येइ काला । वायां वधी ना आह्मांला ॥ १ ॥

**वसु**—( सावध होऊन दुःखानें मनांत ) काय नशीबाचे खेळ होत आहेत पहा ? बंदीवासाच्या असह्य यातना भोगून शेवटीं ही प्राणावर गांठ !

देव०—( वसुदेवास ) प्राणनाथ ! आतां कसं हो करावें ( मिठी मारून आकांत करिते. )

वसु०—( तिला हृदयाशीं धरून रडत )—

पद. ( कसा हा दोष हातें हो ) ही चाल.

प्रिये शोका करिसि वायां । कशाला कष्टविसी काया ॥धृ०॥ सखे जाऊं झणीं स्वर्गा । सुखें भेटूं आप्तवर्गा । करिसि प्राणाचि कां पर्वा । करा नमना सुरां सर्वां । कंस खड्गा शिरें देऊं । स्वर्ग लोकीं सुखा सेवूं ॥ ४ ॥

देव०—( कृष्णास उद्देशून ) पुत्रा ! लवकरच येऊन आमची मुक्तता करणार होतास ती हीच कायरे ? ( मोठ्यानें रडून ) कृष्णा ! आमच्या ह्या अशा आपदा आतां अंतकाळ जवळ आला तरी पहातोस ना ? हे भक्त कैवाऱ्या गोविंदा ! धांव सत्वर आणि चांडाळ कंसाच्या हातून सोडीव !

कंस—( राक्षसांस ) असुरांनो पहातां काय ? उपसा आपापल्या तरवारी आणखी करा यांचा वध.

राक्षस—ओहो अललललल ! ( असें ओरडून तरवारी उपसतात तोंच सुदर्शन येतें व सर्वांचा संहार करतें )

कंस—( तो प्रकार पाहून भयानें मनांत ) कोण बरं संहार करतो ? दैत्यांच्या राशीच्या राशी एका क्षणांत पाडणारा असा वीर तरी कोण असावा ( चाणूर मुष्टिकादि मल्ल कांपतात हें पाहून ) खरोखर वसुदेव देवकीस परमेश्वर सहाय्य आहे ( वसुदेव देवकीस ) वसुदेवा, व भगिनी देवकी ! तुम्ही आतां बंदीशाळेंत जा. ( उग्रसेनास ) ताता ! तुंही कारागृहांत जा. ( चाणूरास ) चाणूरा, जा या तिघांना बंदीखान्यांत नेऊन घाल.

( चाणुर त्यांना नेऊं लागतो, कंस चिंतेंत मग्न होतो. )

देवकी—( जातेवेळीं आनंदानें मनांत. )

पद ( सादरें नमी अंबे भवानी ) ही चाल.

संकटा लया नेई मुरारी। नष्ट भीती झाली बाळ लाज ही निवारी॥धृ॥

वसु०—( सहर्ष देवकीस )

जन्मुनि पोटीं। तो जगजेठी॥ खरें ब्रीद करूनि आजि दावि हे कंस दारी॥

देव०—संकटा लया०॥ १॥ ( जातात पडदा पडतो )

## प्रवेश ४ था.

स्थळ—गोकुळ रस्ता.

**रत्नेश्वर०**—( प्रवेश करून ) या गोकुळांतील गोपपत्न्या झाडून बिघडून गेल्या, तेव्हां त्यांच्या संगतीचं थोडं बहुत फळ आपल्या बायकांना प्राप्त होईल, या भितीनें स्मशानभूमी प्रमाणें या गोकुळाला सोडून स्त्रियांसह आह्मी सर्व ब्राह्मण गांवाच्या दक्षिणारण्यांत गेलों व कृष्णाचा नाश होण्यासाठीं अनुष्ठानं सुरूं केलीं, इतक्यांत देवाच सौंगडी अन्न मागण्यास आले. आम्हीं अग्नीस आहुत्या देत असतां त्या मुलांनीं फारच गोंगाट चालविला, म्हणून मी सर्वांस रागानें मारण्यास धांवलों; मारतां मारतां विटाळ झाला ह्मणून सर्व ब्राम्हणांसह नदीवर स्नानास गेलों. एवढ्यांत आमच्यां बायका 'भगवंत उपोषि राहील तर सगळं जग निजधामास जाईल' असं जाणून ताटांत अन्न भरून देवाला देण्यासाठीं घेऊन गेल्या. त्या प्रसंगीं दुर्दैवानें माझी स्त्री मागें राहिली, आतां जाणार तोच मी आलों पहातों तर बाकीच्या सर्व स्त्रिया गेल्या, मग मी माझ्या स्त्रीस 'रांडे भली सांपडलीस' असें म्हणून केंसाला धरिलें व लागेल तितका मार दिला तरी ती जाण्याचा हट्ट सोडीना !. मग मी तिचे हात पाय पंचानें घट्ट बांधून टाकले. नंतर ती मनांत कृष्णाचा धांवा करून एकदम धडकन भूमीवर प्रेतवत पडली. मी धांवत धांवत जवळ गेलों. व

पहातों तर ती थंडगार झाली ! खरोखर मेली ! प्राण सोडतेवेळीं तिचा ध्यास गवळ्यावर होता यास्तव गवळी बोलावून तिचा भ्रष्ट झालेला देह मातींत गाडून टाकला. ( दुःखाचा सुस्कारा टाकून ) मी विचार नष्टानें अविचारानें वागून स्त्रीहत्तेचं पातक करून घेतलं ! तिला आज मरून बरेंच दिवस झाले तरी मला तिचा व तिच्या गुणाचा विसर पडत नाहीं ! सव वस्तुमात्रांत पूर्ण भरला आहे म्हणून शास्त्र पुराणें सांगतात. त्या सर्वसाक्षी परमेश्वराची ओळख मला पामराला पडली नाहीं आणि म्हणूनच मी त्याला गवळी, चोर, जार कपटी, काळा, पुष्कळ वाईट तऱ्हेचीं विशेषणीं दिलीं. आह्मीं ब्राह्मणांनीं स्नान संधेच्या गर्वानं देवाचा अपमान केला. असो; आतां तरी त्या जगच्चालकांचे पदांबुज निरंतर वंदून ब्राह्मणाचे वंशीं जन्म घातल्याचं सार्थक करावें. (वर पाहून माध्यन्ह रात्र गेली. कांहीं वेळानें सुर्योदय होईल; कारतां आपण यमुना कांठीं जाऊन स्नान विधि उरकून ध्यावा व प्रातःकाळीं प्रथमच श्रीकृष्ण दर्शनास जावं. श्रीरंग ! श्रीरंग ! ! श्रीरंग ! ! ! ( जातो. )

---

## प्रवेश ५ वा.

स्थळ—नंदाचें आंगण. पात्रें—यशोदा, कृष्ण, बलराम व अक्रूर.

अक्रु०—( प्रवेश करितो व कंसास उद्देशून ) कंसा, तूं भयंकर अनर्थ मांडलास ! राज्यांत अंदाधुंदी उत्पन्न केलीस ! धडधडीत पापाचा व्यापार सुरूं केलास. उग्रसेन महाराजांनीं केलेल्या व्यवस्थेविरुद्ध दंडेली करून महाराजांस बंदींत टाकून तूं राज्य पदारूढ झालास ! पापबुद्धीचा स्वीकार करून शल, तोशल, चाणूर, मुष्टिकादि खलांच्या मोहनी जालांत गुंतून राजकार्य धुरंधर असा जो पूर्वींचा सुबुद्धि मुख्य प्रधान, महाराजांचा केवळ उजवा हात त्याला काढून टाकलंस; बरं इतकं करून तरी तूं स्वस्थ

बसलास काय ? नाहीं–नाहीं तूं सख्ख्या बहिणीस व तिच्या पतीस बंदीशाळेचं दुःख भोगण्यास लावून त्याचीं सहा मुलं शिळेवर आपटून मारलीस ! अशीं एक का दोन पापं तं केलीस ? तुझ्या हातीं राज्य येतांच हजारों नीतिमान पुरुष तूं पार कापून टाकलेस. शिव शिव ! कोणत्या वेळीं तुझी धाड कुणावर येऊन पडेल याचा नेम नाहीं; आतां ज्यानं तृणावर्त, अग, बग, केशी, प्रलंब, धेनूक, पूतना, कालिया इत्यादिकांना मृत्युपंथ दाखविला त्या नरवीर पंचानन यदुवर्याला आणण्याकरितां या मला गोकुळास पाठविलंस, किती तुझं कापट्य ! धनुर्यागाच्या निमित्तानं रामकृष्ण मथुरेस आणावं व त्यांच्याशीं मल्लयुद्ध आरंभून त्यांचा प्राण घ्यावा. ज्याप्रमाणं पतंग दीप विझविण्यास धांवतो, जंबुक मृगेंद्राच्या अंगावर जातो किंवा फणींद्र आपल्या घरास खगेंद्रास बोलावून आणतो, त्याप्रमाणें तूं रामकृष्णास नेत आहेस. कंसा ! नकोरे या क्षिराब्धी जामाताशीं वैर जोडून आपल्या जिवाची हानी करून घेऊं ! त्या वसुदेव, देवकीस गांजूं नकोरे रोज ! कुबुद्धि सोडून नीतीनं राज्य चालीव. झालं तें होऊन गेलं आतां या पुढं तरी नीट शुद्धीवर येऊन राम कृष्णाशीं कापट्य करण्याचं सोडून दे. पित्याला बंधमुक्त करून त्या दुष्ट मल्लांना आपल्या जवळून दूर ठेव. त्यांत सर्वस्वी तुझं कल्याण आहे. असं न करशील तर खरोखरच या जगाला मुकशील ! हें माझं वाक्य कधींहि असत्य होणार नाहीं.

( कृष्णाला पोटाशीं धरून यशोदा येते. )

**यशो०**—( कृष्णास ) बालपणींच विश्वरूप तोंडांत दाखवून, गोवर्धन पर्वत करांगुलीवर धरलास. बाळपणींच पूतनेचा प्राण घेतलास. कालियाचं मर्दन करून गोपगाईंना सौख्यांचे दिवस दाखविलेस. यमुनेंत नंद बुडत असतां त्यांना वर घेऊन आलास. शाक्ते ठिकाणीं सर्पानं नंदाला गिळलं तेव्हांहि तूंच त्यांना तारलंस बलरामासह गाई राखत

असतां मस्त व कपटी अशा राक्षसांचा संहार केलास. ( त्याचें मुख कुरवाळून ) ब्रह्मांड नायका ! तुला ‘ माझा पुत्र ’ म्हणण्यास सुद्धां आतां मला लाज वाटूं लागली. वनमाळी ! माता, पिता, बंधु भगिनी सर्व कांहीं तूंच असतां---( डोळ्यांत आस्वे आणून )

पद. ( भार्या नसे बरी ) ही चाल.

वदलें बहुपरी ॥ कटु वच तुज मी पुतनारी ॥ ध्रु० ॥ उखळा बांधुनि मारियलें । सदनीं कोंडुनि ठेवीयलें ॥ कितीदां कोपुनि धिःकारिलें ॥ झालें तदा मि अविचारी ॥ कटु० ॥ १ ॥ गोपी गाऱ्हाणीं ऐकुनी तुजला रडवीलें मारुनी । नवानित खालें तूं चोरुनी । केली मुरारी तूं चोरी ॥ कटु० ॥ २ ॥

( बलराम येतो. )

**बलराम**---( कृष्णास ) कृष्णा, मी रोहिणी मातेची आज्ञा घेऊन आलों तरी अद्याप तुझी निघण्याचीच तयारी होत आहे ना ?

**कृष्ण**---दादा, माझी तर तयारी केव्हांच झाली. पण आधीं आईची समजूत करा.

**बल०**---(यशोदेस) आई ! हें काय बरं आरंभीच अभद्र रडणं ? मथुरेंतील कंसाचा धनुर्याग पहाण्यास जात आहों तों इतकी रडतेस, मग एखाद्या भयंकर युद्धांत आमचा पाडाव होऊन गतप्राण झालों तर प्राणच सोडशील ? आई समंजस विचारी माणसांनीं असा मनाचा धीर सोडून मायेला पोटाशीं धरून बसल्यावर जगाची रहाटी नष्ट होण्यास क्षणाचाहि विलंब लागणार नाहीं बरं ? अग, आमची बालपणाचीं कारस्थानं तूं स्वतः पाहिलीं असून आमच्याबद्दल चित्तांत काळजी सांठवून शोक सागरांत गटांगळ्या कां खातेस ? रोहिणी आईपेक्षां तूं घट्ट मनाची असतां अशा माया मडलांत गोते कां घेतेस ? आवर नयनाश्रु, आणि कृष्णाला धनुर्यागाला जायला निरोप दे. कृष्णासंबंधानें काळजी न वहातां स्वस्थ ऐस. मी बलराम त्याच्या बरोबर आहें तर नांगर मुसळां-

नंच काळ कृतांताचा नायनाट करीन. हं, दे पाहूं हास्य मुखानं कृष्णाला अनुमोदन.

यशो०—रामा, जो कर्ता हर्ता विश्वंभर, त्याला अनुमोदन रे कशाला पाहिजे ! तुह्मी साक्षात शेष नारायण अवतरलां हें मला नाहीं कां कळलं ? कळलं. सारं कांहीं नारदस्वामीच्याच मुखानं कळलं! आतां मातेच्या नात्यानं निरोप देतें, तुह्मी आनंदानं जा; पण लवकर परत या कारण—

पद. ( मोक्षाचा खरा आधार ) ही चाल.

प्राणा या तुह्मीं आधार बारे ॥ धृ० ॥ माय बाप माझे तुह्मिरे ॥ लेकरूं खुळें मी रे ॥१॥ आप्त गोत्र बंधू भगिनी ॥ इष्ट मित्र तुह्मिं सारे ॥२॥

बल०—आई आतां डोळयावाटे पाणी न आणतां आनंदानें घरांत जा.

यशो०—( अक्रुरास ) अक्रूर भावोजी ! ही भाग्याची जोडी जतन करणें सर्वस्वी तुह्मांकडे आहे.

अक्रु०—तुह्मी निश्चींत असा.

कृष्ण—माते, येतो बरं आह्मी आतां ? आमच्या मागं दुःखाचा त्याग करून आनंदानें ऐस ( जाऊं लागतात. )

यशो०—( गहिंवरून )—

पद ( किती तरी तऱ्हेची ) ही चाल.

त्यजुनिया मला तुह्मिं जातां कसें ॥

बल०—माया वरी । नच तूं अंतरीं । धिट मना करी ॥ वस सुखें घरीं ।

यशो०—शून्य सारें गृहदिसे ॥ १ ॥

कृष्ण—खंतिन स्वमनीं । मानि तूं जननीं । मनीं समजे घे । झणीं निरोप दे ।

यशो०—जारे, परि मी करूं कसें ॥ २ ॥

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश ६ वा.

**स्थळ**—रस्ता. **पात्रें**—रत्नेश्वर, यमनी, चिमणी, गोदा वगैरे गौळणी.

**रत्ने०**—( प्रवेश करून ) कृष्णा ! मी तुझ्या चरण दर्शनास आलों असतां तूं रथांत बसून मथुरेचा मार्ग धरलास ! माझा उद्धार करण्यास का बरं विलंब लावलास ? माझी दया तुला येत नाहीं काय ? साधु संताना तुझं नांव दयासागर ठेवले तें नांव आज माझ्याच साठीं अदया-सागर व्हावं काय ? माझ्या प्रिय पत्नीला एकदम मोक्ष पदास पाठविलंस तद्वत मला तुझ्यानं पाठवत नाहीं काय ? श्रीरंगा ! या माझ्या विनंतीला आपल्या श्रवणी जागा देऊन मला पदकमलीं त्वरीत ठाव दे. मला या माझ्या देहाचा अगदीं कंटाळा आला आहे. ( गौळणी येतात. )

**यमनी**—( रत्नेश्वरास ) द्विजश्रेष्ठहो ! आतां इतक्यांत ह्या वाटेनें कुणाचा रथ गेला काय ?

**रत्ने०**—हे वज्रांगने, तुमचा जो प्राणविसावा श्रीकृष्ण त्याला व बलरामाला रथांत घालून अक्रूर घेऊन गेला तीं पहा—त्या रथासमोर गौळणींची दाटी ?

**गौळणी**—[ अक्रूरास उद्देशून ]—

**पद** [ नाशिबा खेळ तुझा ] ही चाल.

काळा अक्रूर घातुका आमुचा कान्हा नेत मथुरेला ॥ सुंदर सांवळा नीळा हरी घरीं नेऊं, देई त्याला ॥ धृ० ॥ अवचित आला कोठुनि मेला घेऊनि जिवलग जिव गेला ॥ घाताचि झाला संसार तरला पडला हा घाला ॥ नंद सु-बाळा फीर दयाळा कर ये दाहिं काला ॥ २ ॥

यम०—बायांनो ! त्या कंसाच्या एकेक कृतीची आठवण झाली कीं,-

आंगावर भीतीचे रोमांच उभे राहतात. अक्रूरा ! नकोरे आमच्या कृष्णाला त्या काळाच्या दाढेंत देऊं ! तो मोठा कपटी असूर आहे !

**गोदा**—आणखी बाई ! त्याची ती पूतना मारल्यापासून तर त्याचा फारच डोळा आहे ! कृष्णाच्या घाताविषयीं त्याचे दुष्ट बेत नित्यशा चालत असतात !

**चिम०**—देवा ! तुला आमचाच जर वीट आला तर हें गोकुळ आम्हांला पाहिजे कशाला ? तुझ्यावांचून आम्ही सर्व व्रजवासी स्त्रीया प्रेतवत आहोंत. या गोकुळाला आग लावून चला बाई आम्ही सुद्धां कृष्णाबरोबर जाऊं.

**रत्ने०**—गोपींनों, पहा तो पहा—कृष्णाचा रथ वाऱ्यासारखा धावूं लागला ?

**गौळणी–पद**( जिव लग प्रिया ) ही चाल.

जिवलग प्रियकर जाइ धावा ॥ कुणी तरी तो रथ अडवा ॥ कर धरोनी आणा माधवा ॥ धृ० ॥ श्री हरि । दया धरि । दासि वरि । कृपा करि । सु-वल्लभा प्रभुवर देवा ॥ १ ॥ टाकुनि कां जासि आह्मां । दानव दुष्ट कदना ॥ असौख्य डोहीं । लोटुनि जाई । जीवाचा बाई विसावा ॥ २ ॥

---

## प्रवेश ७ वा.

**स्थळ**–मथुरा. अरण्य. पात्रें–वनचर व वनचरीण

**वनचर**—( प्रवेश करून )–

**पद** ( मन भयल मिटे ) ही चाल.

मम मूर्ति वरी । वरि स्त्री न परि । धरि रंग ढंग करी मोठा । मनिं राग वरी । मनिं हट्ट धरी । करि बंड, छंद वरि खोटा ।

मज जाच करी । नच भीति वरि धरी दंडचंड करि सोटा । अनिवार मज मार । ती देई सोडि लंगोटी ।

**वनचरीण**—घालोनि घट्ट कांसोटा । तुह्मिं घ्या कीं हातिं भिक लोटा, अन्नास रोजचा तोटा । नित आग लावित पोटा ।

**वनचर**—चुप्प, बोल जरा तुं मंद । करीं मुख बंद । पुरे वन संग । जहालों अंध । कपाळीं घातला तुं वरवंटा ॥ १ ॥

**वनचरीण**—माझ्या वरवंट्याच्या मारानं कपाळ फुटलं नाहीं हें कुठं तुमचं ?

**वन०**—अग फुटायचं काय राहिलं आहे, तुझ्या रोजच्या काळजीनें तें फुटल्यासारखंच आहे तूं मुकाट्यानं माहेरी जा; तुझा सहवास मला नको. मीं तुझ्या आंबट शोकाला मनापासून विटलों आहें.

**वनचरीण**—खरोखरच का माझ्यावरची सरली आपली प्रिती ?

**वनचर**—सरली तर कुठं उरली ! माझं काम साधलं असतं तर तुला मीं सोडलं नसतं.

**वनचरीण**—तुमचं कुठचं साधन साधायचं उरलं ?

**वन०**—श्रीकृष्ण आपल्या या मथुरेंत येणार अशी वदंता पसरली तेव्हांपासून तुझ्यासह त्याचे सेवेला जायचं.

**वनचरीण**—अहो, त्या गवळ्याची सेवा करून आपणांला मिळणार तरी काय ?

**वन०**—अग मोक्षपद.

**वनचरीण**—गवळ्याच्या सेवेनं मोक्षपद मिळतं तर ते महान महान ऋषी हजारों वर्षं तपश्चर्या करतात ती हो कां ?

**वन०**—ह्याच श्रीकृष्णाच्या पदस्थलीं ठाव मिळावा म्हणून.

**वनचरीण**—कुणाच्या त्या चोरट्या कृष्णाच्या ?

**वन०**—होय होय होय. ह्या कृष्णाच्या मूर्खे. ! हाज तो परमात्मा

विश्वंभर श्री विष्णू. रामावतारीं श्री रामचंद्र तो हाच श्रीकृष्ण. आम्हां वानर मंडळींवर याचं पूर्ण प्रेम होतं. रामावताराची स्मृति आहे कुठं ! तूं तें सारं विसरून आतां मोठी विलासिनी झालीस !

वनचरीण—अस्सं काय ! असंच जर खरं असेल तर आजपासून तुमच्या प्रेमांत प्रेमानं वागत जाईन. तुम्हांला गोड गोड खायला वाढीन. तुमची ही सुंदर काया रंग संगांत आलिंगीत राहीन. कधींच दुर्मुखली न होतां तुमची सेवा चाकरी करून पुण्य साधन साधीन. चला, कृष्ण देवाचे सेवेला निघण्याची तयारी करूं.

वन०—( आनंदानें )-

पद. ( भिमाजी अकडबाज ) ही चाल.

कवळी तूं अकडबाज मम नार ॥ धृ० ॥ तूं ग काम तलवार । करीसी बरा याज वर वार ॥ १ ॥

वनचरीण—पुरे स्तुती मज आणा साडि झोंकदार । वेलबुटी त्याच मला चोळी छानदार ॥

वनचर—तुला मी लाल शालु आणणार ॥ चांदणी तूं मी चंद्र दिसणार ॥ १ ॥

( जातात–पडदा पडतो )

---

## प्रवेश ८ वा.

स्थळ–उपवन मार्ग. पात्रें–बलराम, कृष्ण व अक्रूर.

( तिघे प्रवेश करतात )

कृष्ण—( रागानें )-

पद ( कधिं तिला बघिन ) ही चाल,

कधीं वधिन खल कंसा ॥ धृ० ॥ चाणूर मुष्टी ॥ बघती, करण्या दंश ॥ आह्मां, वधुनि त्या, कधीं मनिंची पुरविन हौस ॥ १ ॥ करिन

**कृष्ण**—कां अक्रूर काय, स्नान-संध्या देवतार्चन झालं का ?

**अक्रु**—गोपालकृष्णा ! स्नान-संध्या देवतार्चन होऊन जो कांहीं माझ्या मनांत एक प्रकारचा तरंग वृक्ष वाढत होता तोही मोडून पडला. प्रभो, आपल्या चरण दर्शनानें मी कृतकृत्य होऊन गेलों आहें.

**बल०**—काका, चला आतां रथाकडे, मथुरा पट्टण लवकरच गांठलं पाहिजे,

**अक्र**—चला राम कृष्णा, दोन प्रहर टळून तिसरा प्रहर लागला.

**कृष्ण**—दादा, आधीं कंसाचा धनुर्याग कुठं चालला आहे तो पाहूं मग कंस कंदनास जाऊं.

**बल०**—तसें कां होईना, चला अक्रूर काका ! जातात.

---

## प्रवेश ९ वा.

**स्थळ**—अन्नशाळा. **पात्रें**—कंस, मल्ल, सेवक, बल्लव वगैरे.

( मल्लांसह कंस जेवीत आहे असा पडदा उघडतो. )

**कंस**—( ग्रास उचलीत असतां रागानें बल्लवाकडे वळून )

पद ( त्रिशुल डमरु धरा ) ही चाल.

अधम कपटि हा बल्लव झाला । प्राणावर उलथून पडला । पाकीं मिसळी वैऱ्याला ॥ ध्रु० ॥ शंख चक्र युत काळा । उदकीं दिसतो कृष्ण गोवळा आला घाला घातचि झाला । बसला धक्का चित्ताला ॥ १ ॥

( बल्लवास ) बल्लवा ! माझ्या अन्नावर मस्त होऊन शेवटीं माझ्या प्राणावर येऊन ठेपलास अँ ! अरे, माझ्याहून वरीष्ठ तुला तो गवळ्याचा पोर ! चोर धन्याशीं वैर धरून वैऱ्याशीं प्रेम ! नीच ! नीच ! ! अगदींच नीच कृती तुझी चोरा !!! (सेवकानें दिलेला विडा फेंकून) किती हरामखोर सेवक हे ? माझ्या घाताला जसे कांहीं उत्सुकच होऊन बसले

आहेत; मूर्खांनो, या वाड्यांत वैरी घालून माझ्या मरणाची वाट पाहतां काय ? थांबा. तुमचे प्राणच घेतों. ( आरशांत पाहून ) आठल्या तस्करा, या दर्पणांत सुद्धां तुझा वास ? वैऱ्या चोरा, या मुष्टीप्रहारानं तुझ्या हृदयमेरूचं पिष्ट करून, अवघं गोकुळ कंदुकाप्रमाणें नभोमंडळीं फेंकून देईन, भर रस्त्यांतून वसुदेवासह देवकीस केशीं धरून फरफरां ओढीत आणीन नंदादि व्रजांच्या पोटांत जंबिया खुपसून त्यांचं निर्मूलन करीन. सर्व गोपीमंडळ कुंकुमातिलक विरहीत करून सोडीन आणि जो माझा पिता कपटी थेरडा उग्रसेन त्याचं भव्य भाल लाथेनें—तुडवीन. ( सेवकांस ) अरे कोणी तरी गदा आणा. छे, अशा मर्कटावर गदेचा प्रहार केला तर माझी विजय गदा भ्रष्ट होईल, करितां ते खड्गच आणा. अरे, तें खड्गही नको, कारण तें आजपर्यंत कोट्यवधि वीराचं रक्तपान करून केवळ पवित्र झालं आहे. ठेवा तें एकीकडे ! हा पहा एका क्षणांत मुष्टीघायानं चोराचा प्राण घेतों ( मुष्टी मारतो. आरसा फुटतो ) अरे तें खड्गच माझ्या हातीं द्या ( घेऊन ) काय, यांतही कृष्ण आहे ? ( फेंकून )—

## पद ( ब्यांड ).

वाट कृष्ण ! खाट कृष्ण । पाट कृष्ण । ताट कृष्ण ॥ अन्न कृष्ण । पाणि कृष्ण । पान कृष्ण । प्राण कृष्ण ॥ खड्ग कृष्ण । मल्ल कृष्ण । तोहि कृष्ण । मीहि कृष्ण ॥ वदन कृष्ण । सदन कृष्ण । कृष्ण कृष्ण । सकल कृष्ण

हा कृष्ण जिकडे जावं तिकडे दत्त म्हणून उभा हें काय ? माझा व त्याचा मामा भाचाचा संबंध असतां, सर्व वस्तुमात्रांत वास करून मला भेडसावण्याची त्याला काय बरं जरूरी ? या काळ्याला अक्रूरानं आणलं कां ? त्याचा दोष नाहीं. त्यानं माझ्या आज्ञेप्रमाणें केलं. ( विचार करून ) माझे पूर्वज शूर होते. त्याचप्रमाणं ज्या उग्रसेन राजानं आपलं शौर्य विलक्षण तऱ्हेनें गाजवून, विलक्षण युक्त्या लढवून सार्वभौम पद संपादन

केलं त्या वीराचा पुत्र मी. माझ्या अंगांत बापापेक्षांही अधीक शौर्य आहे. असुरपद बादशाही गाजविण्याची मला उत्कट इच्छा आहे, तो गवळ्याचा पोर ठार मरावा म्हणून मीं पुष्कळ प्रयत्न केले; पण ती माझी इच्छा पूर्ण न होतां माझ्या शूरवीर राक्षसांचा गवळ्यांच्या झोंबींत झालेला पाडाव ऐकून मीं दिवसेंदिवस काळजीनं वेडा होत चाललों. राम कृष्णहो! माझ्या राजधानींत जन्म घेऊन तुह्मीं तो कापट्य बंडाव माजविला आहे त्याचा समाचार मी आतांच अक्रूराची भेट घेऊन घेतों. माझ्या असुरवीरांना कापट्य शक्तीनं ठार मारलंत; पण आतां या कंसाशीं गांठ आहे? लक्ष्यांत ठेवा. तुम्हां सर्व गवळ्यांचा धुव्वा उडवून ही पृथ्वी निष्कंटक करून टाकीन. माझ्या राज्यांत एकही गवळी जिवंत ठेवणार नाहीं! तुमच्या उरावर थै थै नाचून माझ्या नांवाचा डंका त्रयलोकांत गाजवीन. चोर-चोर-चोर-आठवा चोर.

( निघून जातो. )

**चाणू०**—मुष्टिका, रामकृष्ण आल्याची बातमी अक्रूरानं दिल्याबरोबर हें असं पुनः वेड्यासारखं करूं लागले. आतां याला पुढं उपाय काय?

**मुष्टि०**—अरे, महाराज वेडे झाले म्हणून आह्मीं तर होत नाहींना? राम कृष्ण हीं अर्भकं कंदुकाप्रमाणं आपटून मारण्यास आम्ही मल्ल असमर्थ आहों कीं काय?

**शल व तोशल**—आम्ही असमर्थ आहों किं काय? त्या चिलटांस मारण्यास वेळ तो कितीसा लागणार?

**चाणू०**—तें तर शेवटीं आहेच! बरं, चला, आतां राणीमहालाकडे सरकार तिकडेच गेले असावेत.

**सर्व**—चला, चला त्वरा करा.

( आंत जातात पडदा पडतो. )

---

## प्रवेश १० वा.

**स्थळ**—रस्ता. **पात्रें**—वनचर व वनचरीण.

( वनचरीण उकडी वाजवीत व गाणें गात प्रवेश करिते. )

**वनचरीण**—

पद भजनी चाल.

सुंदर सुंदरि मदन मंजरी । मन भुलवी गिरिधारी । हरि मन० ॥धृ०॥ एक जेवतां केवळ घेउनीं । एक कांडतां मुसळ घेउनी । एक दळीतां घिरट घेऊनी । वधण्या कृष्णा जाति धांवुनी । कंठिं नेपुरें, वाळे घालिती धांदल झाली भारी । शीस फूल तें चंद्र बिजवरा गुडग्या बांधिति नारी ॥ मन० ॥ १ ॥ चरणांगुष्टीं गोविति बाळ्या । नेसाति मोतियांच्या जाळ्या । नाकींची नथ पायिं बांधिती । कुंकू डोळ्यांमधें घालिति । मुखास काजळ कुणी लाविती, चरणांला हरिद्राती । घासिति, वेणिंत विडे खोविती नेसण स्कंधीं घेती । मन० ॥ २ ॥ कंचुकि मस्तकिं धारण करिती । नग्न सु-ललना कितीक जाती । कुणी बालकें शिंकिं ठेविती । घागर कडियेवरती घेति । कोणी कामें विव्हळ होता । धांवत धांवत जाती । कृष्ण अनंगा शमविल ह्मणुनी आरति त्याला करिती ॥ मन० ॥ ३ ॥

( वनचर येतो. )

**वन०**—अग शिंचे, तूं अद्याप इकडेच ? नगरांत जिकडे तिकडे हाहाःकार होऊन गेला तत्संबंधीं तुला कांहींच का ठाऊक नाहीं ?

**वनचरीण**—काय ह्मणतां, काय झालें ?

**वन०**—मार्गांत कंसाच्या रजकाचा वध करून, तंतुवाद्य शिंपी, सुदेवा माळी आणि कुब्जा दासी यांचा उद्धार करून " धनुर्याग कुठें आहे " म्हणून लोकांना विचारीत राम कृष्ण नगरांत गेल्यावर, कंसानें

ठेवलेलें अचाट धनुष्य मोडून त्यांचीं दोन शकलें त्यांनीं केलीं, तेव्हां तेथील दैत्य रक्षक महा उन्मत्त मद्यप्राशक परम दुर्मति पिशितभक्षक त्या दोघांच्या अंगावर एक सहस्त्र धांवले. इतक्यांत त्या प्रताप बळी रणभैरव रामकृष्णांनीं कोदंड खंड हातांत घेऊन प्रलय रुद्राप्रमाणें सर्व असूर झोड झोडून गतप्राण केले व कुंड मंडप पार विध्वंसून टाकला. कांहीं वेळानें कंसाच्या आज्ञेवरून महातानें मार्गांत उभा केलेल्या कुवलद्विप नांवाच्या हत्तीसन्निध आले. त्या महातानें राम कृष्णांची बरीच निर्भत्सना केली, तेव्हां श्रीकृष्ण पुढें सरसावून " विष्ठा भक्षका कागा " या राजहंसापुढें तुझें शहाणपण म्हणजे जसें काय तुच्छच. तूं अल्पायुषी असल्यामुळें हे वाईट शब्द तुझ्या मुखांतून निघत आहेत, असें ह्मणून त्याला त्या हत्तीसह गगनांत भिरकावून दिलें. महात तर मेलाच. पण हत्ती कांहीं मरेना ? त्या मस्त हत्तीस दहा वेळा अंबर दाखवून शेवटीं त्याच्या पायांस धरिलें व गरगर भवंडून आपटून मारलें आणि त्या हत्तीच्या दंताच्या योगानें बहुतेक असुरांचा संहार केला. रक्षकांच्या प्रेतांचे पुंजचेपुंज पडले. बिंदो बिंदीं रक्ताचे पूर वाहूं लागले. तो दैत्य स्त्रियांचा आकांत, वक्षःस्थळ पिटणें–

**वनचराण**– ( मध्येंच ) नको बाई ! नको तो वृत्तांत ऐकणें. पुरे करा ! पाहिल्याशिवाय ऐकूनच माझें काळीज धडधड उडूं लागलें ! बरें, आतां राम कृष्णाची स्वारी कुणीकडे गेली ?

**वन०**—कंस कंदनास गेली आहे. कारितां आपण आतां उपवनांत जाऊन उंचशा वृक्षस्कंदीं त्यांची वाट बघत बसूं. आणि ते कंसकंदन करून परत आल्यावर पूर्ववत् त्यांची सेवा करूं.

**वनचरीण**—चला माझ्या अंगांत एकसारखा थरकांप भरला आहे !

( कांपत कांपत वनचरासह जाते. )

---

## प्रवेश ११ वा.

**स्थळ**—दरबार. **पात्रें**—कंस, मल्ल, बलराम, कृष्ण, रक्षक, व नागरिक स्त्रिया.

( कंस सिंहासनावर बसला आहे, असा पडदा उघडतो. ).

**कंस**—( मनांत )—

**पद**—चाल ( विलोकितां मी त्या ).

पहा कसा मूढ जाहलों । आणुनी अरिला खचित फसलों ॥ धृ० ॥ दग्ध कराया माझ्या नगरा । पावक आला घेउनी वारा । त्यावर । सोडाया जलधारा । मी बलहिन झालों ॥ १ ॥

जोंपर्यंत वैरी गोकुळांत होता तोंपर्यंत अनेक दैत्य पाठवून मीं माझ्या जिवाचं रक्षण केलें. आतां तर तो माझ्या संन्निध आला आहे तेव्हां माझा प्राण वांचणं कठीणच !

**रक्षक०**—( प्रवेश करून ) महाराज, असुरकंदन करीत करीत राजवाड्याचे देंवडीजवळ राम कृष्ण आले.

**चाणू०**—( गर्वानें ) येऊं दे. त्यांचा आतां आह्मी चांगलाच समाचार घेतों. ( मल्लांना रांगेनें बसवितो. नंतर बलराम व कृष्ण येतात. )

**कंस**—( त्यांना पाहून कपटानें ) या. या राम कृष्ण बसा या. कृष्णा, तूं माझ्या भेटीस आलास हें पाहून मला जो आनंद झाला आहे त्याचें वर्णन शेषाच्यानेंहि करवणार नाहीं. ( राम कृष्ण बसतात. )

**कृष्ण**—( कंसास ) अहो कसा झालों तरी मी तुमचा भाचा आहे, तेव्हां तुह्मांला आनंद होणें साहजिकच आहे.

( कंस मुष्टिकास खूण करितो ).

**मुष्टिक**—राम कृष्णहो ! आपण सर्व प्रजा कंस राजाचा समारंभ

साजरा करण्याकारितां आलों आहों, तर सर्वांनीं मिळून रायाचें मनोगत पुरविलें पाहिजे.

**कृष्ण०**—आम्हीं रायाचें मनोगत तें काय पुरवावयाचें हें तर समजलं पाहिजे ना ?

**चाणूर**—तुह्मीं आजपर्यंत गोकुळांत गोपाळांसंगें बळकट झोंबी घेत होतां असें आमच्या कानीं आलें, तर आतां भूपालाच्या रंजनास्तव या मल्लांतील पाहिजे त्या मल्लाबरोबर आपण मल्ल युद्ध करावें ( कंसास ) कसें काय महाराज असेंच ना ?

**कंस**–होय असेंच; म्हणजे क्षणभर सभा कौतक पाहील.

**कृष्ण**—चाणुरा, असें जर तुझ्या मनांत आहे तर प्रथम तुझ्याशींच मल्ल युद्ध करतों.

**बल**—आणखी मी करतों मुष्टिकाशीं मल्ल युद्ध.

**चाणूर व मुष्टिक**–ठीक आहे. उठा या आमच्यासमोर.

( मल्ल युद्ध होतें त्यांत चाणूर, मुष्टिक मरतात. पुढें रामकृष्ण प्रत्येक मल्लास धरून ओढतात व भूमिवर आपटून मारतात. )

**कंस**—( भयानें मनांत ) घात झाला ! हे दोघे तर प्रलयाग्नीसारखे दिसतात. यांना लहान कोण म्हणेल ! यांना इथें बोलावून बळेंच मरण जवळ आणलें ! निजलेले सिंह जागे करावेत तद्वत हा प्रकार मीं मूर्खानें करून आपल्याच हातांनीं आपलें आयुष्यजल आटवून टाकलें जसे काल कृतांत मेरू मंदार, समुद्र अंबर, विष्णू पिनाकधर, अंगिरा पती पुरुहूत व भार्गव आणि भार्गवाजित तसे हे दोघेजण माझ्या दरबारांत मला भासत आहेत. ( मोठ्यानें ओरडून ) वीरहो या दोघांना बाहेर घालवा. वसुदेव देवकीस ठार मारा व गवळ्या समेवत तो नंद संहारा जा; धांवा कुणी कारागृहांत जावून त्या थेरड्या उग्रसेनाचा वध करा काय; नाहीं का कुणी माझें ऐकत ! हाय ! हाय ! आतां मात्र माझा

धीर खास खचला ? माझा व माझ्या मल्लांचा संसार आटोपला ! ( वर पाहून ) —

पद—चाल–( झालों कसाई )

आला हा आला। काळा। धरुनि पाश करिं काळा ॥ झर झर चालत आला पाहि कंस काळा । काळ० ॥ धृ० ॥ कोण नसे तुज आतां। मरण वरिल तुज आतां। पापी तूं। घातकी तूं कंसा शूं। चांडाळा ॥ १ ॥ घोर पाप तूं केलें। म्हणूनि तुला मरण आलें। तात कुला। डाग खरा। तूंच खला। लावियला ॥ का० ॥ २ ॥

( इतक्यांत बलरामासह कृष्ण येतो व कंसाचा मुकूट लाथेखालीं घालून कंठ चराचर चिरतो तोंच नागरिक स्त्रिया येऊन खालील गर्भा गातात. )

नागरिक स्त्रिया—

पद ( लोह दंड क्षेत्रीं ) ही चाल.

कंस-कंदनाचा। प्रयोग दावि बाळ देवकीचा। सांवळा। गोवळा। काळा। नंदबाळ नयनीं आज पाहिला ॥ धृ० ॥ कालियास मारी। हाच पुतनारी कमलनयन। कमलवदन। कमलचरण। कान्हा प्रिय माना। अरि जाणा। असुरांचा ॥ १ ॥

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश १२ वा.

स्थळ–बंदिशाळा, पात्रें–देवकी, वसुदेव, अक्रूर, बलराम, उग्रसेन व प्रजा वगैरे.

( देवकी, वसुदेव व अक्रूर प्रवेश करितात )

देवकी—अक्रूर भावोजी, खरेंच माझ्या कृष्णानें कंस कंदन केलें ?

अक्रु०—कंस कंदनच काय; पण येते वेळीं मार्गांत सुदेवा माळी, तंतुवाय शिंपी, व कुब्जा दासी यांचा उद्धार करून कंसाच्या रजकाचा, कुवलद्विप हत्तीचा व महाराजांचा संहार करून राक्षसांचा विध्वंस केला. ( पडद्याकडे वळून ) हे पहा आलेच राम कृष्ण.

( राम कृष्ण येतात, देवकीस कृष्ण भेटतो व वसुदेवास बलराम भेटतो )

वसु०—( बलरामास पोटाशीं धरून )

साकी.

स्पर्श वपुला या बाळाचा । होतां मन्मनिं प्रेमा । उद्भवला कां, कवणाचा तूं । गोंडस बालक रामा । कोण तुझा जनिता । वद्रे कोण तुझी माता ॥ १ ॥

बल०—जनिता आपण व माता रोहिणी.

वसु०—काय माझा पुत्र ?

कृष्ण—ताता, इतकं नको संशयांत पडायला आपणांला. मातेचा सातवा गर्भ गुप्त झाला तो हाच भोगींद्र रोहिणाच्या, गर्भीं जाऊन राहिला.

देव—( आनंदानें )

पद—चाल ( मम मायेने करणारे )

मम रामा रे । मम कृष्णा रे । तुह्मिं दोघे मला आधिं भेटारे । प्रेमभरें रे । चुंबन द्यारे । आलिंगि माय तुह्मांरे ॥ ध्रु० ॥ कंसा वधोनी । गेलां दमोनी । हर्ष मनाला झाला रे ॥ तुह्मिं० ॥ १ ॥

उग्रसेन—( प्रवेश करून ) अहाहा ! किती भाग्याचा दिवस उगवला हा ! आज नातवंडांना पाहून नेत्रांचें सार्थक झालें. बाबानों या मला आलिंगन द्या. ( राम कृष्ण भेटतात )

कृष्ण०—अक्रूर काका, या आमच्या आजोबांना आजच अशा मंगल कार्यींच राज्याभिषेक करून, कंस मातुलाचा दहनविधी संपवू.

अक्रु०—जशी रामकृष्णाची आज्ञा. ( जातो )



देवकी—मम रामारे ! मम कृष्णारे ! तुह्मी दोघे मला आधिं भेटारे !

[ पृष्ठ ८२

*Joshi Art, Bombay.1*

वसु०—( दोघांनां जवळ घेऊन )

पद ( तम चरंजीव ) ही चाल.

कंस कंदनीं मर्दूनी खला ॥ मम मुलां शिण जाहला ॥ धृ० ॥ जावळ यांचें मी न सारिलें ॥ लाविला ना लळा ॥ मम० ॥ क्षण न अंकि घेऊनि रमलों ॥ अर्पिलें गोकुळा ॥ मम० ॥ १ ॥

( अक्रुर सामुग्री घेऊन येतो. )

अक्रु०—( कृष्णास ) गोपाल कृष्णा, ही घ्या महाराजांची राज्याभिषेक सामुग्री. ( देतो )

कृष्ण—दादा, करा आजोबांनां वस्त्रें परिधान ( सिंहासनाचा देखावा दिसतो. बलराम उग्रसेनास वस्त्रें परिधान करितो. )

अक्रु०—( कृष्णास ) देवा ! आतां आपण स्वतः महाराजांचा हस्त धरून सिंहानावर बसवावं.

कृष्ण—सर्वांचे इच्छेप्रमाणें करतों. ( उग्रसेनाचा हात धरून त्याला सिंहासनावर बसावितो. वाद्यें वाजतात दरबारीं लोक हारतुरे वांटतात. )

अक्रु०—( उग्रसेनास ) महाराज, भगवंताजवळ काय मागणें असल्यास ह्याच सुवेळीं मागून घ्या.

उग्र—भगवंत प्रसन्न होऊन देत असल्यास माझे प्रजाजन मागतील तेंच निश्चित असो.

कृष्ण—प्रजाजनांचें काय मागणें आहे ?

प्रजा—( हात जोडून )

पद—चाल ( प्रिय गुण सुंदरी )

जगिं नय नीतीचें जल सांठो ॥ नित भूप प्रजा कार्यीं झटो ॥
नय० ॥ धृ० ॥

बल० भजाल जरि हरि। हि आस तरि पुरि। करील श्रीहरि। ऽऽऽऽऽऽऽ

वसु० व देव०—यादवि द्वेष नसो ॥